पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत



केंद्रीय मुख्यालयात प्रदर्शनी

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 12 ● 16 जून 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.

# 4399 दिवस राष्ट्र सेवेचे



काशी विश्वनाथ कॉरिडॉर




जन धन योजना



नक्षलमुक्त भारत



वंदे भारत – सुरक्षित प्रवास





अटल सेतू



लखपती दीदी




सुरक्षित भारत



किसान सन्मान निधी




अध्यक्षीय मनोगत

# राष्ट्रनिर्माणाची 12 वर्षे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सत्तेतील १२ वर्षांचा कार्यकाळ नुकताच पूर्ण केला. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडला. मोदी सरकारच्या १२ वर्षातील विविध क्षेत्रातील कामगिरीचा या अंकातही विस्ताराने आढावा घेण्यात आला आहे. आपल्या सरकारच्या तपपूर्तीनिमित्त राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांच्या प्रतिनिधींची बैठकही दिल्लीत झाली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सरकारच्या कामगिरीचा लेखा-जोखा सादर केलाच, त्याशिवाय अनेक वर्षे केंद्रातील सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसच्या काळात देशाच्या विकासाकडे आणि सामान्य माणसाच्या हिताकडे झालेल्या दुर्लक्षाचा पंचनामाही केला. गेल्या १२ वर्षात पायाभूत सुविधा विकासासह शेतकरी, महिला, युवक या समाज घटकांच्या कल्याणासाठी घेण्यात आलेले निर्णय आणि या निर्णयांचा प्रत्यक्षात झालेला फायदा याची समग्र आकडेवारी पंतप्रधान मोदी यांनी घटक पक्षांच्या प्रतिनिधींपुढे मांडली. १९५२ ते १९७७ अशी सलग २५ वर्षे काँग्रेसची केंद्रात सत्ता होती. त्याचबरोबर अनेक राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता होती. असे असूनही या काळात गरीब माणूस अधिकच गरीब बनला. विकासाच्या तुलनेत आपला देश अनेक देशांच्या मागेच राहिला. या बैठकीतील पंतप्रधान मोदीजींचे भाषण या अंकात सविस्तरपणे देण्यात आले आहे. हे भाषण प्रत्येक कार्यकर्त्याने आवर्जुन वाचण्यासारखे आहे. मोदी सरकारच्या १२ वर्षातील कामगिरीची आणि या काळात सामान्य माणसाच्या जीवनात कसा फरक पडला, मोदी सरकारच्या योजनांचा किती लाभार्थ्यांना लाभ मिळाला, याची माहिती देणाऱ्या पत्रकार परिषदा राज्यभर होणार आहेत. त्याबरोबरच मोदी सरकारच्या कामगिरीचे माहिती देणारे चित्रप्रदर्शनही अनेक ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. मोदी सरकारच्या ठळक विकास योजनांची माहिती प्रत्येक कार्यकर्त्याला असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गेल्या १२ वर्षात मोदी सरकारच्या धोरणामुळे आपला देश सुरक्षित आणि सामर्थ्यशाली कसा बनला, याचे सविस्तर विवेचन करणारा आपले राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाशजी यांचाही लेख या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. मोदी सरकारच्या कामांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी पक्षातर्फे 'संपर्क अभियान' हाती घेण्यात आले आहे. या अभियानात प्रत्येक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला पाहिजे. मोदी सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांपर्यंत आपण पोहचले पाहिजे. आणखी ३ वर्षांनी लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्या निवडणुकीसाठी आपल्याला आतापासूनच कामाला लागणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मतदार यादी दुरुस्ती अभियानातही लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांचा सहभाग अपेक्षित आहे. हे अभियान संघटनेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. २०२४ मध्ये आपल्याला अपेक्षित यश मिळाले नव्हते. त्यातील प्रमुख कारणापैकी एक कारण व्होट जिहाद हे होते. त्याचबरोबर संविधान बदलाचा खोटा नरेटिव्ह पसरवून मतदारांची दिशाभूल केली गेली. विरोधी पक्ष आपल्या विरोधात कोणत्याही थराला जाऊन अपप्रचाराची मोहीम उघडतात, हे गेल्या १२ वर्षात आपण अनुभवले आहे. सामान्य माणसाच्या मनात भारतीय जनता पार्टीबद्दल आणि मोदी सरकारबद्दल भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी विविध माध्यमातून भाजपाविरोधी शक्ती कार्यरत असतात. या शक्तींचा डाव हाणून पाडण्यासाठी आपल्याला सतत सतर्क राहणे आवश्यक बनले आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

ईश्वराच्या कृपेमुळेच जनसेवेची संधी ०४



सामुहिक विचार, निर्धार आणि स्वप्नपूर्तीची 12 वर्षे ०७



सामर्थ्यवान भारत - सुरक्षित भारत १०




मुस्लिम समाजाचा मोदींवरील विश्वास वाढला १४



अंत्योदयातून गरीब कल्याण १८




तृणमूलमधील बंड आणि भाजपाचे वेगळेपण ३२



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# ईश्वराच्या कृपेमुळेच जनसेवेची संधी



● पंतप्रधान नरेंद्र मोदी

> आजचा दिवस माझ्यासाठी अत्यंत संस्मरणीय आहे. मी भारावून गेलो आहे. मी कृतज्ञ आहे. चरैवेति, चरैवेति या मंत्राचा जप करत, राजकीय प्रवासातील अनेक चढ-उतार अनुभवत असताना, एक दिवस असा टप्पा येईल असा विचार मी कधीही केला नव्हता. निवडून आलेला पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ सातत्याने सेवा करण्याची संधी मिळणे, हे मी माझे परमभाग्य मानतो.

**इतक्या** दीर्घ काळ मातृभूमीची सेवा करण्याचे भाग्य लाभणे हे केवळ ईश्वराच्या विशेष कृपेनेच शक्य आहे. आणि माझ्यासाठी जनताजनार्दन हाच ईश्वराचा साक्षात् अवतार आहे. त्यामुळे मी या सेवाकार्याकडे नेहमीच एक साधना म्हणून पाहिले आहे. ही साधनाही कधी एकाकी नव्हती. हा एक सामूहिक यज्ञ आहे, ज्यामध्ये तुम्ही सर्वांनी आणि असंख्य सहकाऱ्यांनी कर्तव्यभावनेने आपले योगदान दिले आहे. या प्रवासातील अशा सर्व सहकाऱ्यांप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

भारताच्या जनतेचा नीरक्षीर विवेक नेहमीच अद्भुत राहिला आहे. राष्ट्रीय स्तरावर राजकीय स्थैर्याचे महत्त्व देशातील जनतेने ओळखले आहे. जनतेच्या या परिपक्वतेमुळेच मला इतक्या दीर्घकाळ जनसेवेची संधी मिळाली. २०१४ पूर्वीची अनेक दशके अस्थिरता आणि राजकीय उलथापालथ यांनी भरलेली होती. त्यामुळे देशाला मोठे नुकसानही सहन करावे लागले. आता देशातील जनता स्थिर सरकारचे कार्य पाहत आहे आणि

त्याच्या निर्णायक क्षमतेचे कौतुकही करत आहे. आज मी देशाच्या महान जनतेला वंदन करतो आणि जनताजनार्दना प्रती माझी कृतज्ञता व्यक्त करतो. जनतेचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सरकार म्हणून आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपल्याला दिवस-रात्र परिश्रम करावे लागतील. १४० कोटी भारतीयांनी आपल्याकडून ज्या अपेक्षा ठेवल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. भारताचा युवा वर्ग, नारीशक्ती, मध्यमवर्ग आणि शेतकरी या सर्वांच्या आकांक्षा पूर्ण करणे हे आपले कर्तव्य आहे. 'एनडीए'च्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील आणखी एक मोठे यश म्हणजे देश काँग्रेसच्या दुष्टचक्रातून मुक्त झाला आहे. काँग्रेसने देशाला असहायता, हतबलता आणि न्यूनगंडाच्या गर्तेत ढकलले होते. भारतात विकास केवळ संथ गतीनेच होऊ शकतो आणि वेगवान विकास अशक्य आहे, अशी भावना देशाच्या मनात रुजवली गेली. अत्यंत चतुराईने या संथ विकासाला एक नाव देण्यात आले-'हिंदू ग्रोथ रेट'. कार्यपद्धती काँग्रेसची, जबाबदारी काँग्रेसची, अपयश काँग्रेसचे; पण त्याचा कलंक मात्र देशातील मोठ्या हिंदू समाजाच्या नावावर लावण्यात आला.

खरे तर या संस्कृतीचे नाव 'काँग्रेस ग्रोथ रेट' असे असायला हवे होते. या काँग्रेस ग्रोथ रेटमध्ये ना सुशासन होते, ना धोरण होते, ना प्रामाणिक हेतू होता आणि ना निर्णयक्षमता होती. जेव्हा अटलजींच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार सत्तेत आले, तेव्हा विकासाला गती कशी मिळते याची देशाला झलक पाहायला मिळाली. पण दुर्दैवाने २००४ मध्ये देश पुन्हा अस्थिरतेच्या भोवऱ्यात आणि काँग्रेसच्या विळख्यात अडकला. विकास तर दूरच राहिला; काँग्रेसने देशाला एकामागून एक हजारो कोटी रुपयांच्या घोटाळ्यांमध्ये ओढले.

देशाचे भाग्य पुन्हा बदलले ते २०१४ मध्ये एनडीए सरकार सत्तेत आल्यानंतर. देशाने पाहिलं की जेव्हा नियत, नीती आणि निर्णय हे तिन्ही एकत्र काम करतात, तेव्हा विकासाचा वेग कसा वाढतो. देशाने पाहिले की ज्या गोष्टी पूर्ण होण्यासाठी पूर्वी दशके लागत होती, त्या आता काही महिन्यांत पूर्ण होऊ लागल्या.

देशाने विकासाची ही प्रदीर्घ वाटचाल अनुभवली आहे. २०१४ मध्ये देशात केवळ २५ कोटी इंटरनेट वापरकर्ते होते. आज १०० कोटींहून अधिक नागरिक इंटरनेटशी जोडले गेले आहेत. २०१४ मध्ये डिजिटल व्यवहार जवळजवळ नव्हतेच. आज भारत डिजिटल व्यवहारांमध्ये जगातील क्रमांक एकचा देश बनला आहे.

- **२०१४ मध्ये देशात ७४ विमानतळ होते; २०२६ मध्ये त्यांची संख्या १६० हून अधिक झाली.**
- **२०१४ मध्ये १,००० कि.मी. द्रुतगती महामार्ग होते; २०२६ मध्ये ते ६,७०० कि.मी. झाले.**
- **२०१४ मध्ये केवळ ५ शहरांमध्ये मेट्रो सेवा होती; २०२६ मध्ये ती २० हून अधिक शहरांमध्ये पोहोचली.**
- **२०१४ मध्ये संरक्षण निर्यात ७०० कोटी रुपयांची होती; २०२६ मध्ये ती २३ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.**

२०१४ मध्ये भारत आपल्या गरजेतील बहुतांश मोबाईल फोन परदेशातून आयात करत होता. आज भारत स्वतः ३३ कोटींहून अधिक मोबाईल हँडसेटचे उत्पादन करतो. २०१४ मध्ये सौरऊर्जा क्षमता केवळ अडीच गिगावॅट होती; आज ती १५० गिगावॅटहून अधिक झाली आहे.२०१४ मध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण फक्त १.५ टक्के होते; आज ते २० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. २०१४ मध्ये देशात एकही सेमीकंडक्टर युनिट नव्हती. आज देशात १० हून अधिक सेमीकंडक्टर युनिट्स उभारल्या जात असून त्या भारताला आधुनिकतेच्या दिशेने पुढे नेत आहेत.

मित्रांनो, आम्ही देशाच्या गरजांना आमच्या धोरणांचा आणि निर्णयांचा आधार बनवले. नव्या विचारांनी नवे निर्णय घेतले. युवकांसाठी स्वतंत्र कौशल्य विकास मंत्रालय स्थापन केले. सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी स्वतंत्र सहकार मंत्रालय निर्माण केले. आपल्या मच्छीमार बांधवांसाठी स्वतंत्र मत्स्यव्यवसाय मंत्रालय स्थापन केले.

आमचे ध्येय स्पष्ट होते - विकासाच्या या शर्यतीत कोणीही मागे राहू नये. त्यासाठी आम्ही दिव्यांगजनांसाठी कायदा केला. आदिवासी बांधवांसाठी विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या. पशुपालक आणि मच्छीमार यांना पूर्वी किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळत नव्हता; आम्ही त्यांनाही या सुविधेचा लाभ दिला. एवढंच नव्हे तर रस्त्यावरील फेरीवाले आणि हातगाडी चालक यांनाही स्वनिधी योजनेअंतर्गत कर्जसुविधा उपलब्ध करून दिली.

प्रश्न असा आहे की जर १२ वर्षांत इतके काही होऊ शकते, तर ते अनेक दशकांपर्यंत का झाले नाही? हाच काँग्रेस ग्रोथ रेट आणि एनडीए ग्रोथ रेटमधील फरक आहे. म्हणूनच, २०१४ ते २०२६ ही केवळ आकडेवारीची कथा नाही. ही त्या भारताची कथा आहे ज्याने प्रथमच आपल्या संपूर्ण क्षमतेने धावायला सुरुवात केली आहे. हा तो भारत आहे जो मोठी उद्दिष्टे निश्चित करतो आणि ती साध्य करण्यासाठी जिद्द व परिश्रमाने काम करतो.

गेल्या १२ वर्षांत मध्यमवर्गीय कुटुंबांतील मुलांसाठी प्रत्येक क्षेत्रात नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. मध्यमवर्गीयांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी सरकार मदत करत आहे. घरातील वैद्यकीय खर्चाचा बोजा कमी व्हावा म्हणून आयुष्मान भारत योजनेत उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश करण्यात आला आहे.जीएसटी सुधारणांचाही देशातील मध्यमवर्गाला मोठा लाभ झाला आहे. आरोग्य विमा स्वस्त झाला आहे. त्यांच्या स्वप्नांशी निगडित अनेक वस्तू आणि सेवा अधिक परवडणाऱ्या झाल्या आहेत. या प्रयत्नांचा परिणाम असा झाला आहे की आज देशातील मध्यमवर्ग अनिश्चिततेतून मुक्त होत आहे आणि आत्मविश्वासाने देशाच्या विकासयात्रेला गती देत आहे. आमच्यासाठी पक्षापेक्षा मोठे काही असेल तर तो देश आहे. पक्षापेक्षा देश मोठा आहे. आणि जेव्हा 'नेशन फर्स्ट' अर्थात 'देश प्रथम' या भावनेने काम केले जाते, तेव्हा कोणताही निर्णय कठीण वाटत नाही. म्हणूनच जे निर्णय पूर्वी अशक्य मानले जात होते आणि देशाच्या सुरक्षित भविष्यासाठी अत्यावश्यक होते, ते निर्णय आम्ही अत्यंत ठामपणे घेतले.

पूर्वीच्या सरकारांना कलम ३७० विषयी बोलण्यासही भीती वाटत होती. आम्ही ते रद्द करून संपूर्ण देशात एकच संविधान लागू केले. पूर्वी ईशान्य भारताचा उल्लेख झाला की बॉम्ब, बंदुका आणि नाकाबंदी यांच्याच चर्चा होत असत. आम्ही ईशान्य भारतात शांतता आणि स्थैर्य दोन्ही परत आणले. पूर्वी भारत दहशतवादी हल्ल्यांनंतर केवळ वेदना सहन करत राहायचा. आम्ही दहशतवाद्यांवर सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक केला. 'ऑपरेशन सिंदूर'मधून जगाने भारताची ताकद आणि सामर्थ्य पाहिले. एक काळ असा होता की नक्षलवाद आणि माओवाद कधीच संपणार नाहीत, असे मानले जात होते. पण आम्ही देशाला त्या विषारी प्रवृत्तींपासून मुक्त करून दाखवले.



**आमचे सरकार मध्यमवर्गाच्या अपेक्षा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. मध्यमवर्गाचे जीवनमान उंचावणे, त्यांचे जीवन अधिक सुलभ करणे तसेच त्यांच्यासाठी नवीन संधी आणि शक्यता निर्माण करणे यासाठी आम्ही प्रत्येक स्तरावर काम केले आहे. २०१४ पूर्वी मध्यमवर्ग हा कायद्यांतील गुंतागुंत आणि प्रशासकीय अडचणींचा सर्वाधिक बळी ठरत होता. क्लिष्ट करप्रणाली, सामान्य माणसाची मर्यादित आर्थिक साधने, करांचा मोठा बोजा आणि खराब प्रशासनाचा फटका यामुळे सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन अनेक आव्हानांनी भरलेले होते. परंतु आम्ही मध्यमवर्गाच्या अडचणी समजून घेतल्या. त्यांच्या अपेक्षा आणि आकांक्षांची जाणीव ठेवली. त्यामुळे आज १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करण्यात आले आहे. आज देशात सुलभ आणि फेसलेस करप्रणाली कार्यरत आहे. उत्तम पायाभूत सुविधांमुळे नागरिकांचे जीवन अधिक सोपे झाले आहे.**

महिलांना आरक्षण, तीन तलाकविरोधी कायदा, सीएए कायदा, भारतीय न्याय संहिता, सैनिकांसाठी 'वन रँक वन पेन्शन' यांसारखे अनेक निर्णय राष्ट्रहितासाठी घेण्यास एनडीए सरकार कधीही मागे हटले नाही. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. मी आज देशाला पुन्हा एकदा आश्वस्त करू इच्छितो की देशहितासाठी मोठे निर्णय घेण्याची ही प्रक्रिया यापुढेही अधिक वेगाने सुरू राहील. ती आणखी गतीमान होईल.

**(१० जून रोजी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.)**

# सामुहिक विचार, निर्धार आणि स्वप्नपूर्तीची 12 वर्षे

● **नितीन नबीन**, राष्ट्रीय अध्यक्ष

> नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाचा १२ वर्षांचा कार्यकाळ नुकताच पूर्ण केला आहे. जनतेचा विश्वास, देशाचा विकास आणि जनकल्याण अशा मोजक्या शब्दांमध्ये मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या प्रवासाचे थोडक्यात वर्णन करता येईल.

**मागील** १२ वर्षात देशाने रस्ते, पूल, रेल्वे, मेट्रो, विमानतळ अशा पायाभूत सुविधांचा विक्रमी आणि वेगवान विकास पाहिला. त्याच्या बरोबरीने दहशतवाद मोडून काढणारा समर्थ देश, जागतिक पातळीवर प्रतिष्ठा कमावलेला सामर्थ्यशाली देशही भारतीयांनी अनुभवला. २००४ ते २०१४ या १० वर्षात जनतेने प्रचंड भ्रष्टाचार अनुभवला. त्या काळात दहशतवाद्यांनी देशात थैमान मांडले होते. देशात कोणत्याही शहरात दहशतवादी बॉम्बस्फोट घडवून आणत. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी हल्ला चढवून देशाच्या सुरक्षेचे धिंडवडे काढले होते. अशा पार्श्वभूमीवर मोदी सरकारच्या हातात देशाची सत्ता आली. मोदी सरकारने २०१४ पासून जनतेला सुशासन काय असते याचा अनुभव दिलाच त्याचबरोबर सामान्य भारतीयांच्या मनात आपणही देशाच्या विकासात हातभार लाऊ शकतो, असा विश्वास निर्माण केला. कोणत्याही परिस्थितीत दहशतवाद सहन करायचा नाही, अशी ठाम भूमिका घेतल्यामुळे देश दहशतवादापासून मुक्त झाला आहे. नक्षलवाद्यांचा बिमोड केल्यामुळे देश नक्षलमुक्तही झाला आहे. त्यामुळेच जगातील प्रमुख देशांमध्ये भारताची गणना होत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताची भूमिका



जाणून घेतली जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचा मान–सन्मान वाढला आहे. लोक कल्याणाच्या अनेक योजनांमधून जनतेचा विश्वास मिळवत मोदी सरकारने २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याचा संकल्प केला आहे. जनतेच्या सहभागातून विकसित भारताची निर्मिती होणार आहे, हे ठाऊक असल्याने मोदी सरकारने सरकारी धोरणाइतकेच महत्व जनसहभागाला दिले आहे.

देशाची सत्ता दीर्घकाळ भोगलेल्या काँग्रेसने रस्ते, पाणी, वीज, शिक्षण अशा पायाभूत सुविधांचा विकास करण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास ठप्प झाला होता. नरेंद्रजी मोदी यांनी पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर देशाच्या पायाभूत सुविधा विकासाला सर्वाधिक महत्व दिले. गेल्या १२ वर्षात देशात अनेक द्रुतगती महामार्ग तयार झाले आहेत. जम्मू–काश्मीर, ईशान्य भारत या सीमावर्ती भागात रस्ते, पूल, बोगदे, रेल्वे या प्रकल्पांची प्रचंड वेगाने निर्मिती करण्यात आली. काश्मीरला उर्वरीत भारताशी रेल्वेने जोडण्याचा निर्धारही मोदी सरकारने प्रत्यक्षात आणला. पायाभूत सुविधा विकासामुळे देशाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळाली. गेल्या १२ वर्षात ९१ विमानतळ बांधून तसेच १०० टक्के विद्युतीकरणाचे स्वप्न साकार करून पायभूत सुविधांच्या वेगवान विकासाचा नवा अध्याय सुरू केला.



अटल सेतूसारख्या अनेक प्रकल्पांमुळे सामान्य माणसांचे जीवन सुखकर झाले आहे.

मुंबई, पुणे, लखनौसह देशाच्या अनेक शहरांमध्ये मेट्रो जाळे विस्तारते आहे. देशाची जनता वेगवान आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव अनेक द्रुतगती महामार्गांमधून घेत आहे. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे देशाच्या औद्योगिक आणि कृषी विकासाला चालना मिळाली आहे. परिणामी देशांतर्गत रोजगारनिर्मितीही वाढली आहे. अनेक स्टार्ट-अप सुरू झाल्यामुळे देशातला युवक रोजगार मागणारा नाहीतर रोजगार निर्माण करणारा ठरला आहे. गेल्या १२ वर्षात देशात १२ लाख स्टार्ट-अप सुरू झाले आहेत. त्यापैकी १२५ स्टार्ट-अपना युनिकॉर्नचा दर्जा मिळाला आहे. युवकांच्या संशोधन आणि उपक्रमशीलतेला मोदी सरकारने सरकारी पातळीवरून सर्व ते सहकार्य केले. नवउद्योजकांना कोणत्याही अडथळ्याविना बँकांकडून, वित्त संस्थांकडून कर्जपुरवठा व्हावा, यासाठी मोदी सरकारने स्टँडअप इंडिया, मुद्रा यासारख्या योजना सुरू केल्या. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी मोदी सरकारने पंडित दीनदयाळजींनी सांगितलेला अंत्योदयाचा मार्ग स्वीकारला. सरकारी अर्थसहाय्याच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'जनधन'सारखी मोदी सरकारची योजना निर्णायक ठरली. सरकारी अनुदान, अर्थसहाय्य आता गोरगरिबांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा होत आहे. काँग्रेस सरकारच्या काळात सरकारी अनुदान गरीबांच्या हातात पडतच नसे. गोरगरिबांना दिल्या जाणाऱ्या सरकारी अनुदानातील मोठा भाग काँग्रेस सरकारचे 'मध्यस्थ' आपल्या खिशात घालत असत. मोदी सरकारने जनधन योजनेद्वारे आधार आणि मोबाईल क्रमांक एकमेकांना जोडल्यामुळे खऱ्या-खुऱ्या लाभार्थ्यांनाच १०० टक्के सरकारी अनुदान मिळत आहे. यामुळेच गेल्या १२ वर्षात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले. संयुक्त राष्ट्र संघानेही भारताच्या या यशाची दखल घेतली आहे. पंतप्रधान आवास योजनेत ४ कोटी लोकांना स्वत:चे घर बांधून देण्यात आले. वंचित घटकांना, गोरगरिबांना महागडे वैद्यकीय उपचार घेणे परवडत नाही, त्यामुळे मोदी सरकारने या समाजघटकांसाठी 'आयुष्मान भारत' ही आरोग्य विमा योजना चालू केली आहे. ४४ कोटी लोकांना आयुष्मान भारत योजनेचा फायदा मिळणार आहे. मुद्रा योजनेतून अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांना तसेच महिलांना कोणत्याही तारणाशिवाय बँकांकडून, वित्त संस्थांकडून कर्जपुरवठा केला जात आहे. नोटबंदीच्या यशस्वी निर्णयानंतर डिजीटल अर्थ व्यवहारासाठी 'यूपीआय'सारखे अत्यंत प्रभावी माध्यम मोदी सरकारने सुरू केले आहे. पानटपरी, भाजी विक्रेत्यापासून मोठ्या व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांना यूपीआय व्यवहारांचा फायदा मिळत आहे. अनेक देशांनी भारताची यूपीआय प्रणाली स्वीकारली आहे. कोरोना संकटाच्या काळात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वदेशी वस्तू, सेवा (व्होकल फॉर लोकल) यांचा वापर करण्याचे आवाहन भारतीय जनतेला केले होते. पंतप्रधान मोदीजींच्या आवाहनाला भारतीय जनतेने अभूतपूर्व




भारतीय जनतेचे अनेक वर्षांपासूनचे राम मंदिराचे स्वप्न साकार झाले आहे.

प्रतिसाद दिल्यामुळे देशांतर्गत उत्पादनाला उठाव मिळाला आहे. 'खादी'च्या विक्रीत विक्रमी वाढ झाली आहे.

गरीब कल्याणाचे, आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याबरोबर मोदी सरकारने समर्थ भारत, सुरक्षित भारत हा संकल्पही प्रत्यक्षात आणला आहे. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन केला जाणार नाही, हा निर्धार मोदी सरकारने आपल्या कृतीतून प्रत्यक्षात आणल्यामुळे दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या शक्तींचे कंबरडे मोडले आहे. पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून सीमावर्ती भागात हल्ल्याचे प्रयत्न झाल्यानंतर मोदी सरकारने सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक आणि गेल्या वर्षीच्या ऑपरेशन सिंदूर यासारख्या कठोर लष्करी कारवाया करून दहशतवाद्यांवर मोठा आघात केला. पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अनेक तळ उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. देशाच्या सीमावर्ती भागात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास केल्यामुळे देशाची सुरक्षा आणखी बळकट झाली आहे. दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी लष्कराला स्वातंत्र्य दिल्यामुळे सुरक्षित भारताची संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. देशाच्या मोठ्या भागातील नक्षलवाद्यांचे साम्राज्य मोदी सरकारने मोठ्या निर्धाराने मोडून काढले. नक्षलवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी सुरक्षा दलाच्या जवानांना आवश्यक ती सर्व उपकरणे, शस्त्रे पुरवण्यात आली. नक्षलवाद्यांविरुद्ध लढताना सुरक्षा दलाला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. त्याचबरोबर नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या भागात विकासाच्या अनेक योजना प्रभावीपणे पोहचवल्या गेल्या. सरकार आपल्या मागे खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास नक्षलवादी भागातील सामान्य जनतेच्या मनात




निर्माण झाल्यामुळे गोरगरीब आदिवासी नक्षलवाद्यांच्या विरोधात उभे राहिले. एकीकडे विकसित भारताची पायाभरणी करत असताना दुसरीकडे मोदी सरकारने वैभवशाली भारतीय संस्कृतीचा अभिमानही ठेवला आहे. समृद्ध भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी मोदी सरकारने काशी विश्वनाथ कॉरिडॉर, उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर यासारखे प्रकल्प पूर्णत्वास नेले. कोट्यवधी भारतीयांचे अयोध्येतील श्रीराम मंदिराचे स्वप्न साकार केले. कोरोना संकटाच्या काळात तसेच अन्य प्रसंगामध्ये मोदी सरकारने अनेक देशांना मदतीचा हात दिला. यामुळे जगात भारताची प्रतिष्ठा वाढली आहे. ३२ देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन गौरविले आहे. मोदी सरकारमुळे जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे भारतीय वाटचाल सुरू आहे. गेल्या १२ वर्षातील नवभारत निर्मितीच्या पायाभरणीबद्दल प्रत्येक भारतीय मोदी सरकारचा कृतज्ञ आहे.

**('टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखाचा अनुवाद.)**

# सामर्थ्यवान भारत- सुरक्षित भारत

● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री

जो देश स्वत:चे संरक्षण करु शकत नाही, तो देश हळूहळू आपले सामर्थ्य, सार्वभौमत्व आणि प्रसंगी स्वातंत्र्यही गमावून बसतो. ही बाब लक्षात घेता, पंतप्रधानपदाची शपथ घेतल्याक्षणापासून नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रसुरक्षेच्या दृष्टीने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. सर्जिकल स्ट्राईक असो अथवा ‘ऑपरेशन सिंदूर’मधील नेत्रदीपक कामगिरी, भारताच्या संरक्षणसज्जतेला जगानेही मान्य केले. पण, त्याहीपलीकडे शस्त्रास्त्र आयात करणारा भारत हा शस्त्रास्त्रांचा निर्यातदार म्हणूनही जागतिक पातळीवर कीर्तिमान प्राप्त करताना दिसतो. नरेंद्र मोदी सर्वाधिक कार्यकाळ पूर्ण करणारे भारतीय पंतप्रधान ठरण्याबरोबरच, त्यांच्या नेतृतवाखालील सरकारच्या तपपूर्तीनिमित्त राष्ट्रसुरक्षेच्या पर्वाचा सविस्तर आढावा घेणारा हा लेख...

**दि.** १० जून हा भारतीय संसदीय लोकशाहीच्या प्रवासातील एक उल्लेखनीय टप्पा ठरला असून, या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आजवर निवडणूक प्रक्रियेतून निवडून



आलेल्या देशाच्या पंतप्रधानांमध्ये सर्वाधिक कार्यकाळ पूर्ण करणारे पंतप्रधान ठरले आहेत. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर असलेला ४ हजार, ३९८ दिवसांचा विक्रम मागे टाकत, पंतप्रधान मोदी यांनी ४ हजार, ३९९ दिवसांची राष्ट्रसेवा पूर्ण केली आहे. मुख्यमंत्री आणि पंतप्रधान या दोन्ही जबाबदाऱ्यातील त्यांचा कार्यकाळ एकत्रित विचारात घेतल्यास सलग २५ वर्षे म्हणजेच, नऊ हजार, सात दिवसांच्या अखंड सार्वजनिक जीवनाचा टप्पाही त्यांनी पूर्ण केला. सातत्य, प्रचंड कार्यक्षमता आणि अविरत कर्मनिष्ठा यांचा संगम असलेल्या एका कर्मयोग्याचा हा प्रवास आहे.

देशाच्या विकासाला नवी दिशा देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आणि विविध क्षेत्रांतील भरीव योगदानामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १२ वर्षांचा कार्यकाळ निश्चितच स्मरणात राहील. तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीकरणासाठी त्यांनी दिलेले योगदानही विसरता येणार नाही. ‘राष्ट्र प्रथम’ या तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून, त्यांनी दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुतेचे धोरण अवलंबिले. दि. १३ जून २०१४ रोजी भारतीय लष्कराच्या ‘साऊथ ब्लॉक’मधील संरक्षण कक्षात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशी संवाद साधत आणि



ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा दलाच्या जवनांची भेट घेतली.

संरक्षण-सज्जतेचा आढावा घेत, त्यांनी राष्ट्रीय सुरक्षेला त्यांच्या सरकारचे असलेले प्राधान्य स्पष्ट केले होते. देशात दिवाळीच्या उत्सवात घरे दीपप्रकाशाने उजळून निघत असताना, पंतप्रधान मात्र सीमेवरील जवानांमध्ये उपस्थित राहून राष्ट्र त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा संदेश देत आले आहेत. सियाचीनपासून सुरू झालेली ही परंपरा त्यांनी गेल्या १२ वर्षांत १२ विविध सीमावर्ती ठिकाणी जाऊन पंतप्रधानांनी जपली आहे.

राष्ट्रसुरक्षेच्या संदर्भात आचार्य चाणक्य यांनी म्हटले आहे की, 'सामर्थ्यवान सैन्याविना कोणतेही राष्ट्र सुरक्षित राहू शकत नाही.' १९६२ मधील चीनविरुद्धच्या युद्धातील पराभव आणि १९६४ मध्ये चीनने केलेल्या अणुचाचणीनंतर निर्माण झालेल्या नैराश्यपूर्ण परिस्थितीतून देशाला बाहेर काढण्यासाठी भारतानेही अण्वस्त्रसज्ज व्हावे, अशी भूमिका 'भारतीय जनसंघा'ने दि. ४ डिसेंबर १९६४ रोजी पाटणा अधिवेशनात मांडली होती. त्यावेळी काँग्रेससह इतर अनेक राजकीय पक्षांनी या मागणीची खिल्ली उडविली होती. मात्र, जनसंघाच्या या संकल्पनेची प्रत्यक्ष पूर्तता, पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली दि. ११ मे १९९८ रोजी पोखरण अणुचाचणीद्वारे झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वकाळात संरक्षण क्षेत्राच्या बळकटीकरणाला विशेष गती मिळाल्याचे दिसून येते. २०१४ मध्ये सुमारे २.२७ लाख कोटी रुपयांवर असलेला संरक्षण अर्थसंकल्प तिपटीने वाढून ७.८५ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. भारत आज १००हून अधिक देशांना संरक्षणसामग्रीची निर्यात करीत आहे. २०१४ मध्ये केवळ ६८६ कोटी रुपयांपर्यंत मर्यादित असलेली संरक्षण निर्यात, २०२५-२६ मध्ये ३८ हजार, ४२४ कोटी रुपयांवर पोहोचली असून, ती तब्बल ५६ पटींनी वाढल्याचे लक्षात येते. स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही भारताने लक्षणीय प्रगती साधली आहे. हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे, 'ब्राह्मोस', बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, शत्रूच्या हवाई संरक्षण प्रणाली आणि रडारला नष्ट करणारी 'रुद्रम-२', 'प्रलय', 'आकाश' यांसारख्या अत्याधुनिक शस्त्रप्रणालींची निर्मिती देशातच होत आहे. स्वदेशी विमानवाहू युद्धनौका 'आयएनएस विक्रांत', 'राफेल' लढाऊ विमाने आणि 'एस-४००'संरक्षण प्रणालीमुळे भारतीय संरक्षण-सज्जतेला नवे बळ प्राप्त झाले आहे. आर्मेनियाच्या येरेवान रिपब्लिक स्क्वेअरमध्ये झालेले भारतनिर्मित 'आकाश' हवाई संरक्षण प्रणाली आणि 'पिनाका' रॉकेट प्रक्षेपण प्रणालीचे प्रदर्शन, भारतीय संरक्षण उद्योगाच्या वाढत्या जागतिक प्रतिष्ठेचीच प्रचिती देते.

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी लाल किल्ल्यावरून राष्ट्राला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी,

स्वदेशी क्षमता आणि भारतनिर्मित शस्त्रास्त्रांनी हे सिद्ध केले आहे की, राष्ट्रीय सुरक्षा परकीय अवलंबित्वावर उभी राहू शकत नाही, असे म्हटले होते. त्याचेच प्रतिबिंब 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये दिसले. अवघ्या २२ मिनिटांमध्ये आपल्या सैन्याने त्यांचे लक्ष्य साध्य केले होते. तसेच सुमारे ७२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभारण्यात येणारा 'ग्रेट निकोबार' प्रकल्पही भारताच्या आर्थिक प्रगतीबरोबरच सागरी धोरण, लष्करी सामर्थ्य आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही आधार ठरणार आहे.

संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनांना चालना देणे, संरक्षण अर्थसंकल्पात सातत्याने वाढ करणे, सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण आणि त्याचबरोबर अंतर्गत सुरक्षेची घडी अधिक मजबूत करणे, ही गेल्या दशकातील महत्त्वपूर्ण पावले मानली जातात. २०१४ पूर्वी पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाने गंभीर स्वरूप धारण केले होते. केवळ काश्मीरच नव्हे, तर देशातील अनेक प्रमुख शहरेही दहशतवादी हल्ल्यांच्या छायेत होती. मुंबई, जयपूर, दिल्ली, काशी आणि अन्य शहरांमध्ये घडलेल्या भीषण दहशतवादी घटनांच्या आठवणी आजही अस्वस्थ करणाऱ्या आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांना अत्याधुनिक शस्त्रसामग्री, बुलेटप्रूफ जॅकेट्स आणि आधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली. दहशतवादाच्या आर्थिक पुरवठ्यावर आळा घालण्यासाठी 'नो मनी फॉर टेरर'सारख्या उपक्रमांनाही चालना देण्यात आली, तर 'एफएटीएफ'च्या माध्यमातून दहशतवादाला पाठबळ देणाऱ्या घटकांवर वित्तीय दबाव निर्माण करण्याबरोबरच, 'सर्जिकल स्ट्राईक' आणि बालाकोट हवाई कारवाईसारख्या लष्करी मोहिमांद्वारेही दहशतवादी तळांवर प्रहार करण्यात आला. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानातील दहशतवादी केंद्रांना लक्ष्य करण्यात आले आणि पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांनाही नष्ट करण्यात आले, तर 'कलम ३७०' रद्द करण्याचा निर्णय हा देशाच्या राजकीय आणि प्रशासकीय एकात्मतेच्या दृष्टीने ऐतिहासिक टप्पा ठरला. ३१ मार्च २०२६ हा ऐतिहासिक दिवस केवळ देशच नव्हे, तर संपूर्ण जगही स्मरणात ठेवेल. कारण, याच दिवशी आपण डाव्या विचारसरणीने प्रेरित नक्षलवादाच्या विळख्यातून मुक्त झालो. २०२४ मध्ये देशातील १२६ जिल्हे नक्षलवादी दहशतीच्या प्रभावाखाली होते. त्याच वर्षी २९० नक्षलवादी ठार झाले, एक हजार, ९० जणांना

**नक्षलवादाचा बिमोड**



अटक करण्यात आली; तर ८८१ जणांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला. आज बस्तरसह सर्व नक्षलप्रभावित प्रदेशांत विकासाची नवी चाहूल लागली असून, प्रगतीचे वारे वाहू लागले आहेत.


घुसखोर देशाची लोकशाही व्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा आणि लोकसंख्येच्या समतोलासमोर गंभीर आव्हान निर्माण करीत आहेत. या संकटावर मात करण्यासाठी भारत सरकारने 'डिटेट, डिलीट आणि डिपोर्ट' या धोरणांतर्गत कठोर कारवाई हाती घेतली आहे. सीमांवरील पहारा अधिक कडक करण्यात आला असून, घुसखोरी रोखण्यासाठी विविध स्तरांवर उपाययोजना राबविल्या जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या विजयानंतर बांगलादेशी घुसखोरांच्या बांगलादेशकडे परतणाऱ्या रांगा दिसू लागल्या आहेत. १५ हजार, १०६ किलोमीटर लांबीच्या सीमेला जागृत करण्यासाठी लेझर वॉल, व्हायब्रेशन सेन्सर्स आणि 'नाईट व्हिजन' कॅमेऱ्यांचा वापर करण्यात येत आहे. सीमासुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी अर्थसंकल्पात ४९ टक्क्यांची वाढ करण्यात आली असून, त्यासाठी पाच हजार, ५९७ कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे.

अदृश्य युद्धाच्या माध्यमातून भारताच्या सायबर सुरक्षेला आव्हान देण्याचे प्रयत्न, भारतविरोधी शक्तींकडून सातत्याने केले जात आहेत. राज्यसभेत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, सुमारे ५४ लाख सायबर तक्रारी आणि ३१ हजार, ५९४ कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रयत्नांना तोंड देण्यात भारताला यश आले आहे. सायबर

सुरक्षेला अधिक सक्षम करण्यासाठी भारत सरकारने २०२४ मध्ये 'सायबर कमांडो' व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेतला. 'डीसीवायए' (डिफेन्स सायबर एजन्सी) आणि 'आय-फोर-सी' यांच्या समन्वयातून सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. देशाला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी, तसेच दहशतवादासारख्या समस्यांच्या अर्थपुरवठ्याचे प्रमुख साधन असलेल्या अमली पदार्थांच्या बेकायदा व्यापारावरही कठोर प्रहार करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त करण्याच्या कारवाया सातत्याने सुरू आहेत. २०२४ या वर्षातच २५ हजार, ३३० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले, ही बाब त्या प्रयत्नांचे ठोस उदाहरण मानली जाते.

सीमा सुरक्षेमध्ये सीमावर्ती गावांमध्ये राहणाऱ्या ग्रामस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांच्या मनात उपेक्षेची भावना निर्माण होऊ नये, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी, ही भारताची शेवटची गावे नसून, भारतमातेची पहिली गावे असल्याचे म्हटले होते. 'व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्रॅम'च्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांतर्गत ४ हजार, १२१ गावांच्या विकासासाठी सुमारे ११ हजार, ६३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून सर्व ऋतूंमध्ये वापरता येतील असे रस्ते, सौरऊर्जा, मोबाईल संपर्क व्यवस्था, शिक्षण, आरोग्य आणि पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. २०२३च्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सीमावर्ती ६०० गावांच्या सरपंचांच्या सहभागाने सीमा आणि दिल्ली यांचा संगम साधला गेला होता.

आपल्या 'पंच प्रण' संकल्पामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताने गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्याचे आवाहन केले होते. त्याअनुषंगाने वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी आणि भारतीय स्वाभिमानाच्या पुनर्स्थापनेसाठी अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. 'आयपीसी' आणि 'सीआरपीसी' यांतील तरतुदींना आता भारतीय न्याय संहितेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. 'राजपथा'चे 'कर्तव्यपथ', '७, रेस कोर्स रोड'चे '७, लोककल्याण मार्ग', पंतप्रधान कार्यालयाचे 'सेवातीर्थ' आणि 'राजभवना'चे 'लोकभवन' असे नामांतर करण्यात आले आहे. 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ'च्या नियुक्तीमुळे तिन्ही सैन्यदलांमधील समन्वय अधिक बळकट झाला



आहे. भारतीय नौदलाचे प्रतीकचिन्हही आता ब्रिटिश सत्तेच्या स्मृतींऐवजी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या परंपरेची आठवण करून देते. 'तिरंग्या'तील अष्टकोनी चिन्ह, शिवराजमुद्रा, 'शं नो वरुणः' हा वैदिक मंत्र आणि अशोकस्तंभ यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. प्रजासत्ताक दिनानंतर सैन्यदलांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या 'बीटिंग रिट्रीट' समारंभातही बदल करण्यात आला असून, इंग्रजी संगीताच्या जागी ज्येष्ठ गायिका स्वर्गीय लता मंगेशकर यांनी अमर केलेल्या 'ए मेरे वतन के लोगो' या देशभक्तिपर गीताचा समावेश करण्यात आला आहे. सैन्यदलांमधील महिलांचा वाढता सहभाग, सैनिक शाळांची वाढती संख्या आणि 'अग्निवीर' योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेत समाजाचा सहभाग अधिक व्यापक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने घेतलेले अनेक ऐतिहासिक निर्णय दीर्घकाळ स्मरणात राहतील. राष्ट्राची सार्वभौमता, आर्थिक प्रगती आणि सामाजिक शांतता या सर्वांचा पाया भक्कम सुरक्षा व्यवस्थेतच दडलेला असतो. सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचाच परिणाम म्हणून आज देश गरीब-कल्याण, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधत आहे. त्याचबरोबर आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करत, जागतिक पटलावरही भारत आपले मानाचे स्थान अधिक दृढ करीत आहे. राष्ट्रीय सुरक्षेबाबत सतत जागरूक राहून, २०४७ पर्यंत 'विकसित भारत' या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी देशाने वाटचाल करावी, हाच प्रत्येक नागरिकाचा संकल्प बनला पाहिजे. ■

# मुस्लिम समाजाचा मोदींवरील विश्वास वाढला

● आबिद अली यासीन चौधरी



> भारताच्या लोकशाही इतिहासात गेल्या बारा वर्षांचा काळ हा परिवर्तन, विकास आणि आत्मविश्वासाचा काळ म्हणून ओळखला जातो. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०१४ मध्ये देशाची धुरा स्वीकारल्यानंतर सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हा मंत्र केवळ घोषवाक्य न राहता तो शासन व्यवस्थेचा पाया बनला. मोदी सरकारने यशस्वी १२ वर्षे पूर्ण करताना देश एका नव्या युगात प्रवेश करत असल्याची भावना सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे.

१२ वर्षांच्या कालखंडात भारताने अनेक क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली. पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, परराष्ट्र धोरण, संरक्षण, गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय या प्रत्येक क्षेत्रात मोदी सरकारने ठोस निर्णय घेत देशाला नव्या उंचीवर नेले. एकेकाळी विकसनशील देश म्हणून ओळखला जाणारा भारत आज जगातील प्रभावशाली राष्ट्रांच्या यादीत आत्मविश्वासाने उभा आहे. मोदीजींच्या सरकारच्या कार्यकाळातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेल्या योजना. जनधन योजना, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, किसान सन्मान निधी यांसारख्या योजनांमुळे गरीब, शेतकरी, महिला आणि वंचित घटकांना थेट लाभ मिळाला. शासनाची मदत थेट नागरिकांच्या खात्यात पोहोचविण्याची व्यवस्था निर्माण करून भ्रष्टाचारावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण आणण्यात आले.

डिजिटल इंडिया मोहिमेमुळे भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी झेप घेतली. गावागावात इंटरनेट पोहोचले, ऑनलाइन व्यवहार वाढले आणि आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे. कोरोना महामारीसारख्या कठीण काळातही भारताने जगासमोर सक्षम नेतृत्वाचे उदाहरण ठेवले. मोफत लसीकरण, गरिबांना अन्नधान्य वितरण आणि आरोग्य व्यवस्थेचे सक्षम नियोजन यामुळे देशाने संकटावर मात केली. एक मुस्लिम समाजातील कार्यकर्ता म्हणून मला विशेष अभिमान वाटतो की, मोदी सरकारने समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम महिलांना तिहेरी तलाकसारख्या




अन्यायकारक प्रथेतून मुक्त करण्याचा ऐतिहासिक निर्णय हा महिलांच्या सन्मानासाठी घेतलेला धाडसी निर्णय होता. शासनाच्या अनेक योजनांचा लाभ आज मुस्लिम समाजातील युवक, महिला आणि गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे विकासाच्या राजकारणात धर्मापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी नवी विचारधारा देशात मजबूत होताना दिसत आहे.

भारतीय जनता पक्षाने देखील संघटनात्मक पातळीवर देशभरात सामान्य कार्यकर्त्यांना संधी दिली. बूथ स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत पक्षाची मजबूत यंत्रणा उभी राहिली. राष्ट्र प्रथम हा विचार केंद्रस्थानी ठेवून भाजपने जनतेमध्ये विश्वास निर्माण केला आहे. आज अनेक तरुण देशसेवेच्या भावनेने भाजपशी जोडले जात आहेत, हीच पक्षाच्या कार्यपद्धतीची मोठी ताकद आहे.

मोदी सरकारची तपपूर्ती केवळ सत्तेचा उत्सव नसून राष्ट्र निर्माणासाठी केलेल्या अथक परिश्रमांचा गौरव आहे. देशहित सर्वोच्च मानून घेतलेले निर्णय, गरीबांच्या कल्याणासाठी असलेली बांधिलकी आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सुरू असलेली धडपड यामुळे मोदी यांचे नेतृत्व जनमानसात अधिक दृढ झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः मुस्लिम समाजाशी संवाद वाढवण्यासाठी राबविण्यात आलेले सूफी संवाद अभियानच्या माध्यमातून तसेच सौगात-ए-मोदी यांसारखे उपक्रम सामाजिक एकात्मतेचे प्रभावी उदाहरण ठरले आहेत. या उपक्रमांमुळे मुस्लिम कुटुंबांच्या मनात विश्वास आणि आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे.

सूफी परंपरा ही प्रेम, शांतता आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा मानली जाते. या विचारांना प्रोत्साहन देत मोदी सरकारने समाजातील सलोखा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला. सौगात-ए-मोदी उपक्रमांच्या माध्यमातून गरीब आणि गरजू मुस्लिम कुटुंबांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला. त्यामुळे शासन हे केवळ एका समाजासाठी नसून सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे, हा संदेश अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचला. आज अनेक मुस्लिम युवक आणि कुटुंबे विकास, शिक्षण आणि राष्ट्रहिताच्या मुद्द्यांवर सकारात्मक विचार करू लागली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हा दिलेला संदेश प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केला आहे. त्यामुळे भारत हा विविधतेत एकता जपणारा आणि सर्व धर्मांना समान सन्मान देणारा देश आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मुस्लिम समाजातील तरुण पिढी आज शिक्षण, रोजगार, उद्योग आणि डिजिटल क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर



अन्यायकारक तिहेरी तलाक पद्धतीतून मोदी सरकारने देशातील मुस्लिम महिलांची मुक्तता केली आहे.

पुढे येत आहे. केंद्र सरकारच्या कौशल्य विकास योजनांमुळे अनेक युवकांना स्वावलंबी होण्याची संधी मिळाली. मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया आणि स्किल इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे छोट्या व्यवसायांना चालना मिळाली असून मुस्लिम समाजातील अनेक युवक उद्योजकतेकडे वळताना दिसत आहेत. विकासाच्या या नव्या प्रवाहामुळे समाजात आत्मविश्वास वाढला आहे.

मोदी सरकारने देशातील महिलांच्या सन्मान आणि सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले. मुस्लिम महिलांच्या अधिकारांसाठी घेतलेला तिहेरी तलाक विरोधातील निर्णय हा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरला. अनेक मुस्लिम महिलांनी या निर्णयाचे स्वागत केले आणि शासनाने महिलांच्या सन्मानासाठी घेतलेली भूमिका देशभरात चर्चेचा विषय ठरली. आज मुस्लिम समाजातील महिला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक क्षेत्रात अधिक सक्षमपणे पुढे येताना दिसत आहेत.

केंद्र सरकारने अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना, कौशल्य प्रशिक्षण आणि शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिल्या. मदरसा आधुनिकीकरणासोबतच आधुनिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक शिक्षणाबाबत जागरूकता वाढली आहे. राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याची भावना अधिक दृढ होत आहे. आज देशातील सामान्य नागरिकांच्या मनात राष्ट्र प्रथम ही भावना अधिक मजबूत झाली आहे. जातीधर्माच्या राजकारणापेक्षा विकास, सुरक्षा आणि स्थिर नेतृत्वाला प्राधान्य देणारा मतदार निर्माण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर देशातील विविध समाजघटकांचा वाढता विश्वास हेच या परिवर्तनाचे मोठे उदाहरण आहे. आगामी काळात विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची साथ आवश्यक आहे. सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांवर भारत अधिक वेगाने प्रगती करेल, असा विश्वास आज देशातील कोट्यवधी नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाने हा विश्वास अधिक दृढ केला आहे. एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मला विश्वास आहे की, आगामी काळातही भारत विकास, सुरक्षा आणि आत्मनिर्भरतेच्या मार्गावर अधिक वेगाने पुढे जाईल आणि विकसित भारत २०४७ हे स्वप्न निश्चितच साकार होईल.

**(आबिद अली यासीन चौधरी हे भाजपा राष्ट्रीय अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय सहप्रभारी आहेत.)**

# १२ वर्षांतील भारताची विकासयात्रा

● चंदन गोस्वामी

**भारताच्या** लोकशाही इतिहासात काही कालखंड केवळ सत्तांतरासाठी नव्हे, तर शासनाची दिशा, राजकीय विचारप्रवाह आणि राष्ट्रीय आकांक्षांच्या पुनर्स्थापनेसाठी स्मरणात राहतात. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला, तेव्हा देश अनेक आव्हानांना सामोरे जात होता. भ्रष्टाचाराचे आरोप, आर्थिक अनिश्चितता आणि जागतिक स्तरावर भारताचा मर्यादित प्रभाव या परिस्थितीत देश वाटचाल करत होता. जून २०२६ मध्ये मोदी सरकार १२ वर्षे पूर्ण करीत असताना देशाचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. नरेंद्र मोदी हे स्वतंत्र भारतातील त्या मोजक्या पंतप्रधानांपैकी एक आहेत ज्यांनी सलग तीन कार्यकाळ राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आपली प्रभाव कायम राखला आहे. ही कामगिरी केवळ निवडणूक विजयांचे फलित नसून विकास, राष्ट्रवाद, सुशासन आणि जनसंपर्क यांचा संगम घडविणाऱ्या राजकीय शैलीचे प्रतीक आहे.

नरेंद्र मोदी सरकारचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शासनाच्या चर्चेला जातीय आणि प्रादेशिक समीकरणांच्या चौकटीतून बाहेर काढून विकास, पायाभूत सुविधा आणि सरकारी योजनांच्या थेट लाभांवर केंद्रित करण्याचा प्रयत्न. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास ही घोषणा केवळ राजकीय न राहता अनेक योजनांचा आधार बनली.

गेल्या १२ वर्षांत देशात महामार्ग, द्रुतगती मार्ग, रेल्वे, विमानतळ आणि डिजिटल संपर्क सुविधांचा उल्लेखनीय विस्तार झाला आहे. ग्रामीण भागात रस्ते, वीज आणि इंटरनेट पोहोचल्याने सामाजिक व आर्थिक परिवर्तनाला गती मिळाली आहे. रेल्वेचे आधुनिकीकरण, वंदे भारत रेल्वे गाड्यांचा विस्तार, मालवाहतुकीसाठी स्वतंत्र कॉरिडॉर आणि स्थानकांचा पुनर्विकास यामुळे वाहतूक क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.

एकेकाळी ठराविक वर्गापुरती मर्यादित असलेली हवाई सेवा आता लहान शहरांपर्यंत पोहोचत आहे. प्रादेशिक संपर्क योजनेमुळे देशातील दुर्गम भागांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा प्रयत्न झाला आहे. हा बदल केवळ सुविधांचा विस्तार नसून आर्थिक क्रियाशीलता आणि रोजगाराच्या संधींचा विस्तार देखील आहे.

मोदी सरकारच्या सर्वात मोठ्या उपलब्धींपैकी अत्यंत महत्वाचा बदल म्हणजे डिजिटल इंडिया संकल्पना. गेल्या दशकात भारताने डिजिटल पेमेंट, आधार आधारित सेवा आणि थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून प्रशासनात तांत्रिक परिवर्तन घडवून आणले आहेत. या तांत्रिक बदलांचे मोठे फायदे सामान्य माणसाला झाले आहेत.

आज भारत जगातील सर्वात मोठ्या डिजिटल पेमेंट व्यवस्थांपैकी एक आहे. यूपीआयमुळे छोट्या दुकानदारांपासून ग्रामीण ग्राहकांपर्यंत सर्वांना रोखरहित व्यवहारांच्या प्रवाहात सहभागी होता आले आहे. सरकारी योजनांचा निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होऊ लागल्याने भ्रष्टाचार आणि मध्यस्थ संस्कृतीचे उच्चाटन झाले आहे. जनधन खाती, आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीमुळे सरकारी सेवा गरिबांपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली गेली. कोविड महामारीच्या काळात डिजिटल यंत्रणेद्वारे मदत वाटप झाल्याने या प्रणालीची उपयुक्तता सिद्ध झाली.

मोदी सरकारने गरीब कल्याणाचा कार्यक्रम राबविण्यासाठी अनेक योजनांचा प्रारंभ केला. उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस जोडणी, आवास योजनेअंतर्गत घरे, शौचालय बांधकाम, प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी, वीज जोडणी आणि मोफत धान्य योजना यांसारख्या उपक्रमांचा ग्रामीण आणि अल्प उत्पन्न गटांना थेट फायदा मिळाला आहे. स्वच्छ भारत अभियानाने सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक वर्तनातील बदलांवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरु झाली. आयुष्मान भारत योजनेद्वारे आरोग्य सुरक्षेचा विस्तारही महत्त्वाचा ठरला. यामुळे गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांना महागड्या उपचारांच्या आर्थिक ओझ्यातून दिलासा मिळवून देण्याचा प्रयत्न झाला.

राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर मोदी सरकार निर्णायक ठरलेले निर्णय घेतले. सीमासुरक्षा, दहशतवादविरोधी धोरण आणि संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणावर विशेष भर देण्यात आला. ■

नवभारताची 12 वर्षे

# अंत्योदयातून गरीब कल्याण



**2** लाख रुपये

जीवन विमा संरक्षण योजने अंतर्गत कोणत्याही कारणामुळे मृत्यू प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा मिळणार. योजनेसाठी 27.33 कोटीहून अधिक नोंदणी झाली आहे.

- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत अपघातामुळे मृत्यू झाल्यास तसेच कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास 2 लाख रुपयांचे तर अंशतः अपंगत्वासाठी 1 लाख रुपयांचे विमा संरक्षण. यात 57.92 कोटी नोंदणी झाली आहे.




- स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि महिला उद्योजकांना उत्पादन, व्यापार, सेवा आणि कृषी संबंधित उपक्रमांमध्ये ग्रीनफिल्ड प्रकल्प उभारण्यासाठी 62,790 कोटी रुपयांची 2.75 लाख कर्ज मंजूर करण्यात आली आहेत.
- जनधन-आधार-मोबाईल तिहेरी शक्तीने जनधन खात्यांना मोबाईल फोन आणि आधारशी जोडून एक मजबूत आर्थिक समावेशन मंच तयार केला आहे.
- पीएम स्वनिधी योजना - प्रारंभापासून ते 15 एप्रिल 2006 पर्यंत पदपथ विक्रेत्यांना 74.90 कोटी रुपयांची कर्ज देण्यात आली आहेत.

## जल जीवन मोहीम

**12.61** कोटी अतिरिक्त ग्रामीण कुटुंबांना 13 मे 2026 पर्यंत नळ जोडणी देण्यात आली.

2019 मध्ये मोहीमेचा प्रारंभ झाला तेव्हा 3.23 कोटी (16.7 टक्के) ग्रामीण कुटुंबांकडे नळ जोडणी होती.

**15.85** कोटी कुटुंबांना 13 मे 2026 पर्यंत घरी नळाद्वारे पाणी मिळाले आहे, देशातील 19.36 कोटी ग्रामीण कुटुंबांच्या तुलनेत.

- 10 मार्च 2026 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने जल जीवन मोहीमेला डिसेंबर 2028 पर्यंत मुदत वाढ देण्यास मंजुरी दिली.



“

*मला कष्टाचा कधीच कंटाळा येत नाही. उलट माझ्या कष्टाने गरीब जनतेच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य मला प्रचंड समाधान देते.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

नवभारताची 12 वर्षे

# गरीब कल्याण

## गोरगरीबांना मिळाला सन्मान

*भारत सरकारच्या कामगिरीचा आज विषय येतो तेव्हा गरिबांचे कल्याण सर्वात वरील स्थानावर असते. केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांपासून गरिबांच्या कल्याणाला आपले ध्येय बनवले आहे, येथे लांगुल चालन नव्हे तर समाधान हाच पाया आहे. यात पीएम गरीब कल्याण अन्न योजना देशातील मोठ्या लोकसंख्येसाठी आणखी एक सुरक्षा कवच प्रदान करते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे 2014 मध्ये केलेले गरीब कल्याणाचे संकल्प पूर्ण करणाऱ्या असंख्य योजनांनी ग्रामीण आणि गरीब लोकांच्या आयुष्यात बदल घडवून आणला आहे. जागतिक विश्वासार्ह अहवालातून निदर्शनास येत आहे की भारतात गरीबी झपाट्याने कमी झाली आहे कारण सर्वोच्च नेतृत्वाच्या प्रत्येक निर्णयात अंत्योदयासोबतच गरिबांचे कल्याण आणि सक्षमीकरण हे कायमस्वरूपी केंद्रबिंदू बनले आहेत...*

### पी एम गरीब कल्याण अन्न योजना



**81** कोटी

लोकांना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत अन्नधान्य मिळत आहे

**5** वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, 1 जानेवारी 2024 पासून


- मार्च 2024 पर्यंत पोष्टिक तांदळाचा पुरवठा यशस्वीपणे करण्यात आला, गिरणीतील तांदूळ पौष्टिक तांदूळात रूपांतरित करण्यात आला.
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत देशभरातील शंभर टक्के शिधा पत्रिकांचे डिजिटेलीकरण करण्यात आले आहे.
- सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एक राष्ट्र एक शिधा पत्रिका योजना राबविण्यात आली आहे. मार्च 2026 पर्यंत 207 कोटीहून अधिक पोर्टेबिलिटी व्यवहारांची नोंद झाली आहे.

**25** कोटी नागरिकांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गरिबीवर मात केली आहे. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळात गरिबांना सक्षम करण्याची मोहीम आणखी वेगाने पुढे सरकली आहे.

**19%** देशात सामाजिक सुरक्षा 2015 मध्ये होती. 2025 मध्ये ती 64.3% वर पोहोचली. 94 कोटीहून अधिक नागरिकांना किमान एका सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ मिळत आहे.

**12** कोटी शौचालये

स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधण्यात आली असून त्यामुळे देश उघड्यावरील शौचापासून मुक्त झाला आहे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे.




### आर्थिक सुरक्षा

**58.12** कोटी प्रधानमंत्री जनधन खाती 15 एप्रिल 2026 पर्यंत उघडण्यात आली आहेत. या खात्यांमध्ये सुमारे 2.94 कोटी रुपये जमा झाले आहेत.




**32.21** कोटी (55.8%) जनधन खाती महिलांची आहेत आणि सुमारे 45.17 कोटी (78.2%) पीएमजेडीवाय खाती ग्रामीण आणि निम-शहरी भागात उघडण्यात आली आहेत.

नवभारताची 12 वर्षे

# कृषी विकासासाठी मोठा निधी

## कृषी विकासासाठी निधी

अर्थसंकल्पात 2026-27 साठी कृषी क्षेत्राकरिता 1,32,561 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषी, शिक्षण आणि संशोधनासाठी अंदाजे 9,967 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून कृषी विकासाला सातत्यपूर्ण प्राधान्य देण्याची सरकारची वचनाबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित होते.

## प्रधानमंत्री किसान मानधन योजना

**24.96** कोटी शेतकऱ्यांची नोंदणी 6 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रधानमंत्री किसान मानधन योजनेत झाली आहे.

**60** वर्षे वय पूर्ण झाल्यावर 3,000 रुपयांचे मासिक हमी निवृत्ती वेतन मिळण्याची तरतूद आहे. प्रवेशाच्या वयानुसार मासिक योगदानाची किंमत 55 रुपये ते 200 रुपयांदरम्यान असते.



*आज केंद्रात असणारे सरकार शेतकऱ्यांचा खर्च कमी करण्यासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत प्रामाणिक प्रयत्न करत आहे. पीएम किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसे हस्तांतरित करणारी जगातील सर्वात मोठी योजना आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## शेतकऱ्यांना अनुदानित दरात खते

कोरोना महामारी आणि त्यानंतर झालेल्या युद्धांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किमती अनेक पटींनी वाढल्या. परदेशी बाजारात खते मिळणे कठीण झाले होते. मात्र, केंद्र सरकारने हे संकट टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले

**3,000** रुपयांना युरियाची जी पिशवी आंतरराष्ट्रीय बाजारात मिळते तीच केंद्र सरकार शेतकऱ्यांना 300 रुपयांपेक्षा कमी किमतीत देत आहे.



- 12 लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च सरकारने आपल्या तिजोरीतून यावर केला आहे, जेणेकरून शेतकऱ्यांवर बोजा पडणार नाही.
- गेल्या 12 वर्षात केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांभोवती एक मजबूत संरक्षक कवच विणले आहे. एम एस पी, स्वस्त कर्ज, पिक विमा आणि पीएम किसान सन्मान निधी यांसारख्या योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरले आहेत.
- शेतकऱ्यांची शेती नवीन तंत्रज्ञानाशी जोडली जावी, त्यांना नवीन सिंचन पद्धतीशी जोडले जावे आणि त्यांच्या पिकांना अधिक उत्पन्न मिळावे, हे निश्चित करण्याच्या उद्देशाने सरकारने 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' धोरण तयार केले. ठिबक आणि तुषार सिंचना सारखी सूक्ष्म सिंचन तंत्र शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली.
- केंद्र सरकारने कुसुम योजना सुरू केली. आज अनेक शेतकरी सौर पंपाचा वापर करून केवळ आपल्या जमिनीला पाणी देत नाही तर वीज निर्माण करून पैसेही कमवत आहेत.



# शेतकरी कल्याण

नवभारताची 12 वर्षे

## शेतक-यांचे आयुष्य बदलले

*अनेक दशकांपासून दुर्लक्षित असलेले भारताचे शेतकरी म्हणजेच अन्नदाते आता भारताच्या विकास प्रवासाचे भागीदार बनले आहेत. शेतकऱ्यांबद्दलच्या या दृष्टीकोनामुळे कृषी मंत्रालयाचे नाव बदलून आता कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय असे ठेवण्यात आले आहे. आपल्या याच दूरदृष्टीनुसार गेल्या 12 वर्षांपासून केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरण करण्यासाठी पेरणीपूर्व, पेरणी दरम्यान आणि पेरणी पश्चात विविध योजनांच्या माध्यमातून त्यांच्या प्रत्येक गरजेची काळजी घेत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मिळाली आहे एक नवीन दिशा...*

### वाढते अन्न उत्पादन

**357.73** दशलक्ष मेट्रिक टनाहून जास्त विक्रमी अन्नधान्य उत्पादनाची नोंद 2024-2025 साली भारताने केली.

**150** दशलक्ष टन उत्पादनासह भारत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला आहे.



- भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश बनला आहे. हे नील अर्थव्यवस्थेतील देशाचे यश दर्शवते.



- दूध उत्पादनातही भारत जगातील सर्वात यशस्वी देशांपैकी एक म्हणून ओळखला जातो. सहकारी चळवळीच्या सामर्थ्याचा हा परिणाम आहे.



### पी एम किसान सन्मान निधी

या योजनेअंतर्गत दरवर्षी रुपये 6 हजाराची आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे शेतकऱ्यांच्या आधार जोडलेल्या बँक खात्यांमध्ये तीन समान हफ्त्यांमध्ये हस्तांतरित केली जाते. स्थापनेपासून आतापर्यंत 9 कोटीहून अधिक शेतकऱ्यांना 22 हप्त्यांमध्ये रुपये 4.27 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे.



### एम एस पी मध्ये सातत्याने वाढ

- 2018-19 पासून सरकारने सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमतीत (एम एस पी) वाढ केली आहे. ही वाढ उत्पादन खर्चाच्या किमान 1.5 पट केली जाते जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चावर किमान 50 टक्के परतावा मिळू शकेल.

नवभारताची 12 वर्षे

# पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना

## दोन महत्त्वाच्या नवीन योजनांची सुरुवात



- देशाची आत्मनिर्भरता आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 ऑक्टोबर 2025 रोजी दोन महत्त्वाच्या नवीन योजनांची सुरुवात केली.
- पहिली 'प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना' आणि दुसरी 'कडधान्य आत्मनिर्भरता मिशन'.

'प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजने'साठी **24,000** कोटी रुपये खर्चाची, तर 'कडधान्य आत्मनिर्भरता मिशन'साठी 1,440 कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

- या योजनांवर सरकार एकूण 35 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करणार आहे. या दोन योजना भारतातील कोट्यवधी शेतकऱ्यांचे नशीब बदलण्याचे काम करतील.



### किसान क्रेडिट कार्ड

31 डिसेंबर 2025 पर्यंत 7.57 कोटी शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून **10** लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आली आहे.

- शेतकऱ्यांना शेती आणि पशुपालनासारख्या गरजांसाठी किसान क्रेडिट कार्डद्वारे कमी व्याजदरात सहजरीत्या कर्ज मिळत आहे.

31 जानेवारी 2026 पर्यंत सहकारी संस्थांच्या सदस्यांना **1.55** कोटी 'रुपे केसीसी कार्ड' जारी करण्यात आली आहेत.





## 12 वर्षांतील कामगिरी

- गेल्या 12 वर्षांत, भारताची कृषी निर्यात जवळपास दुप्पट झाली असून उत्पादन सुमारे 900 लाख मेट्रिक टनाने वाढले आहे.
- फळे आणि भाज्यांचे उत्पादन 640 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त वाढले आहे. आज भारत दूध उत्पादनात जगात पहिल्या क्रमांकावर आहे.
- भारत हा जगातील दुसरा मोठा मत्स्य उत्पादक देश बनला आहे. मध उत्पादनही 2014 च्या तुलनेत दुप्पट झाले आहे आणि गेल्या 12 वर्षांत अंडी उत्पादनही दुप्पट झाले आहे.
- या कालावधीत देशात 6 मोठे खत कारखाने उभारण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना 25 कोटींपेक्षा जास्त मृदा आरोग्य कार्ड्स मिळाल्या आहेत. 1 कोटी हेक्टर क्षेत्रातील जमिनीवर सूक्ष्म सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे.
- सूक्ष्म सिंचन सुविधा 9 कोटी हेक्टर जमिनीपर्यंत पोहोचली आहे.
- 'पीएम पीक विमा योजने'द्वारे शेतकऱ्यांना विम्याच्या दाव्यापोटी सुमारे दोन लाख कोटी रुपये मिळाले आहेत.
- 12 वर्षांत 10 हजारांपेक्षा जास्त शेतकरी उत्पादक संघटना (**FPOs**) स्थापन झाल्या आहेत.

## जागतिक कृषी बाजारपेठेत भारत

- कृषी निर्यातीतून मिळणारे उत्पन्न आर्थिक वर्ष 2020 मध्ये 34.5 अब्ज डॉलर्स होते, ते आर्थिक वर्ष 2025 मध्ये वाढून 51.1 अब्ज डॉलर्स झाले आहे.
- आर्थिक वर्ष 2025 मध्ये, प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांसह कृषी आणि अन्न उत्पादनांची निर्यात 49.43 अब्ज अमेरिकी डॉलर्स इतकी झाली. ही देशाच्या एकूण निर्यातीपैकी सुमारे 11.2 टक्के आहे.

12 वर्षांत कृषी आणि शेतकरी कल्याणावरील खर्चासाठीची आर्थिक तरतूद 6 पटीने (6X) वाढली




> *स्वातंत्र्याच्या इतक्या दशकांनंतर आज देशात, शेतकऱ्यांचे दुःख आणि त्यांच्या चिंता समजून घेणारे असे सरकार आले आहे. म्हणूनच भारत सरकारद्वारे सातत्याने शेतकरी हिताचे निर्णय घेतले गेले आहेत. आम्ही बियाण्यापासून ते बाजारपेठेपर्यंत शेतकऱ्यांसाठी नवीन व्यवस्थांची निर्मिती केली आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# आरोग्य

नवभारताची 12 वर्षे



## वैद्यकीय पर्यटन

- वर्ष 2025 मध्ये 5,07,244 परदेशी नागरिक विशेषत्वाने आरोग्य सेवेमार्फत उपचार घेण्यासाठी भारतात आले.
- वर्ष 2030 पर्यंत वैद्यकीय पर्यटनाची बाजारपेठ वाढून 16.2 अब्ज डॉलर इतकी होईल, असा अंदाज.
- ई-वैद्यकीय व्हिजा आणि ई-वैद्यकीय मदतनीस व्हिजा सुविधा आता 172 देशांमध्ये उपलब्ध करून दिली आहे.

## आरोग्यवैद्यकीय पर्यटन निर्देशांक वर्ष 2020-21 अनुसार...

- भारत वैश्विक स्तरावर शीर्ष 46 वैद्यकीय पर्यटन स्थळांमध्ये10 व्या स्थानावर आहे.
- जगातील अव्वल 20 निरामय आरोग्य पर्यटन बाजारामध्ये 12 व्या स्थानावर आहे.
- अशिया- प्रशांत क्षेत्रामध्ये अव्वल 10 आरोग्य देखभाल स्थानांमध्ये 5 व्या स्थानावर

## स्वस्त आणि गुणवत्तापूर्ण औषधे

**19,200** जन औषधी केंद्रांवर प्रधानमंत्री भारतीय जन औषधी परियोजनेच्या (पीएमबीजेपी) माध्यमातून गुणवत्तापूर्ण जेनेरिक औषधे किफायतशीर दरामध्ये उपलब्ध.

- या केंद्रांवर 2,100 पेक्षा जास्त औषधे आणि 315 शल्य चिकित्सेसाठी आवश्यक उत्पादने उपलब्ध आहेत. या सर्व उत्पादनांची बाजारमूल्यांपेक्षा 50 ते 90 टक्के कमी दराने विक्री केली जाते.

जवळपास **40,000** कोटी रूपयांची बचत सर्वसामान्य लोकांना स्वस्त औषधे मिळाल्यामुळे झाली आहे.



## खिशावरील आर्थिक भार झाला कमी

- आरोग्य उपचारांवर होणार खर्च वर्ष 2014-15 मध्ये 62.6 % होता. तो कमी होऊन 2020-21 मध्ये 39.4 % झाला आहे. यामध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे खूप मोठे योगदान आहे.



## राष्ट्रीय आरोग्य धोरण, 2017

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली 15 मार्च, 2017 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय आरोग्य धोरण, 2017 ला मंजूरी दिली. यामागे असा उद्देश्य आहे की, आरोग्य सेवा धोरणाच्या माध्यमातून सर्वोत्तम आरोग्य सेवा सर्वांना देता यावी, तसेच कोणत्याही प्रकारे आर्थिक अडचण निर्माण न होता, उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा प्रदान करणे शक्य व्हावे.

## सुखद घटना

- 2014 मध्ये भारत पोलिओ मुक्त घोषित
- 2015 मध्ये नवजात बालकांना होणा-या धनुर्वाताचे निर्मूलन
- 2024 मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने भारत ट्रॅकोमा म्हणजे विशिष्ट जीवाणू संसर्गामुळे होणारा नेत्रआजार मुक्त झाल्याचे केले घोषित
- भारत नजीकच्या वर्षांमध्ये काळाआजार निर्मूलनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.



# आरोग्य

नवभारताची 12 वर्षे

## आरोग्य संपन्नतेच्या दिशेने भारत

*तुम्हाला हे माहिती आहे का, की व्यक्तीच्या सरासरी आयुर्मानामध्ये एका वर्षाची वाढ झाली तर देशाच्या जीडीपीमध्ये 4 टक्के वृद्धी होते! याच कारणामुळे स्वतंत्र भारतामध्ये आरोग्य क्षेत्राला पहिल्यांदाच 2014 मध्ये फक्त प्राधान्य दिले इतकेच नाही तर, विद्यमान सरकारने या क्षेत्रासाठी धोरणात्मक कार्यक्रमाची आखणी केली आणि या कार्याला सर्वोच्च स्थानावर ठेवले. स्वस्त आरोग्य सेवा उपलब्ध करून, आरोग्यदायी भविष्य सुरक्षित करण्यासाठी गेल्या 12 वर्षांमध्ये भारत सरकारने उत्कृष्ट परिणामांच्या दिशेने पावले टाकली आहेत. आज भारत विश्वातल्या सर्वात मोठ्या आरोग्य सेवा कार्यक्रमाचे म्हणजेच आयुष्मान भारताचे करीत आहे नेतृत्व...*

### आरोग्य शिक्षणामध्ये 12 वर्षांमध्ये झाले परिवर्तन

- **23** एम्स, 2014 मध्ये हा आकडा 7 होता.
- **172%** पर्यंत वाढल्या 12 वर्षात वैद्यकीय शिक्षणाच्या जागा
- **818** झाली ॲलापॅथी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या; 2014 मध्ये 387 होती.
- **323** दंतवैद्यकशास्त्र आणि 942 आयुष संस्था
- **1,28,975** पर्यंत पोहोचली 51,384 वरून एमबीबीएसच्या जागांची संख्या
- **85,020** पर्यंत पोहोचल्या, 31,185 वरून वाढून वैद्यकीय पदव्युत्तर पदवी शिक्षणाच्या जागा.

### लसीकरण



**12** प्रकारच्या आजारांपासून संरक्षण करण्यासाठी नवजात बालके आणि लहान मुलांना लस देण्यात येत आहे.

- वर्ष 2015 मध्ये सुरू करण्यात आलेल्या मिशन इंद्रधनुष कार्यक्रमांतर्गत ज्या गर्भवतींचे लसीकरण झालेले नाही किंवा ज्यांचे काही प्रमाणात लसीकरण झाले आहे, त्यांचा समावेश करून गरजेनुसार लसी देण्यात आल्या.
- दरवर्षी 2.9 कोटी गर्भवती आणि 2.54 कोटी नवजात बालकांचे मोफत लसीकरण
- वर्ष 2026 मध्ये गर्भाशयाच्या मुखाशी होणाऱ्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी एचपीव्ही लस देण्यास प्रारंभ
- पूर्ण लसीकरण - वर्ष 2015 मध्ये 62 टक्के होते, त्यामध्ये वाढ होवून जानेवारी 2026 मध्ये 98.4 टक्के झाले.
- कोविड -19 च्या काळामध्ये भारताने 200 कोटींपेक्षा जास्त लस मात्रा दिल्या.

नवभारताची 12 वर्षे

# 'आयुष्मान भारत'चा लाखो कुटुंबांना फायदा



## दिसून आले चांगले परिणाम

- 1990 पासून एमएमआर म्हणजेच मातृ मृत्यू दरामध्ये 86 % घट झाल्याचे दिसून आले आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 48 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.
- पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांच्या मृत्यू दरामध्ये 78 % घट नोंदवली गेली आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 61 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.
- नवजात अर्भकांच्या मृत्यू दरामध्ये 70 % घट झाल्याचे दिसून आले आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 54 टक्के आहे.
- बाल मृत्यू दरामध्ये गेल्या दशकामध्ये 37 टक्क्यांपेक्षाही जास्त घट झाल्याच नोंद आहे. पूर्वी म्हणजे 2013 मध्ये जन्मलेल्या आणि जगलेल्या बालकांपैक प्रतिहजारी 40 बालकांचा मृत्यू होत असे. आता हे प्रमाण कमी होवून 2023 मध्ये 25 झाले आहे.



### संस्थेमध्ये होणारी प्रसुती

| | ग्रामीण क्षेत्र | | शहरी क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| | वर्ष 2017-18 | वर्ष 2025 | वर्ष 2017-18 | वर्ष 2025 |
| संस्थेमध्ये होणारी प्रसुती | 90.5% | 95.6% | 96.1% | 97.8% |

## प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (पीएम-जय)

- 23 सप्टेंबर, 2018 मध्ये ( एबी-पीएमजेएवाय) सुरू करण्यात आली. ही जगातील सर्वात मोठी सार्वजनिक आरोग्य सेवा योजना आहे.
- सामाजिक - आर्थिक रूपाने वंचित कुटुंबांसाठी आणि 70 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या सर्व नागरिकांना औषधोपचारासाठी प्रतिवर्ष 5 लाख रूपयांपर्यंतचे आरोग्य कवच

**12** कोटींपेक्षा जास्त लोकांना मिळाले औषधोपचार

**36,038** रूग्णालयांनी योजनेत केली नोंदणी

**43.93** कोटींपेक्षा जास्त आयुष्मान कार्ड बनविले.



## आयुष्मान आरोग्य मंदिर

**1,84,235** आयुष्मान आरोग्य मंदिर ( 27 फेब्रुवारी, 2026 पर्यंत कार्यरत आहेत.)

**42.6** कोटींपेक्षाही जास्त लोकांना (31 डिसेंबर, 2025) दूरस्थ संपर्क यंत्रणेमार्फत दिला आरोग्य सल्ला.



नवभारताची 12 वर्षे

# महिला सशक्तीकरण

# देश उभारणीत महिलांचा सहभाग

*नारी तू नारायणी, तुझ्यामध्येच सामर्थ्य आहे, तूच राष्ट्रशक्ती आहेस. या संकल्पाबरोबरच नवीन भारत उत्कृष्टतेचे नित्य नवे अध्याय लिहीत आहे. महिला शक्तीशिवाय कोणतेही राष्ट्र समृद्धी साध्य करू शकेल, याची कल्पनाही करू शकत नाही. अशावेळी केवळ महिला उत्थान नाही तर महिला शक्तीच्या नेतृत्वाखाली विकासाचा दृष्टिकोन बाळगल्यामुळे गेल्या 12 वर्षांमध्ये राष्ट्राच्या धोरणाचा महत्वपूर्ण आधार महिला बनल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, आर्थिक समृद्धी आणि नेतृत्वाच्या संधींमुळे महिलांना सशक्त करण्यासाठी राबवलेले अनेक उपक्रम या प्रवासात मैलाचे दगड ठरले. आता लोकसभा -विधानसभा यांमध्ये 33 टक्के महिलांना आरक्षण देण्यासाठीही केंद्र सरकार आहे कटिबद्ध...*

## महिला सशक्तीकरणाच्या दिशेने टाकलेली पावले

**2023** मध्ये नवीन संसद भवनामध्ये 'नारी शक्ती वंदन विधेयक' आणून, या स्वरूपामध्ये सर्व प्रथम पाऊल उचलण्यात आले.

14 लाखांपेक्षा जास्त महिला आज भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध मंडळे, समित्यांवर यशस्वीतेने काम करीत आहेत. जवळपास 21 राज्यांमध्ये तर पंचायतींमध्ये महिलांची भागीदारी जवळपास 50 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.





- गेल्या 12 वर्षांमध्ये 3 कोटींपेक्षा जास्त महिला 'पीएम घरकूल योजना' अंतर्गत घराच्या स्वामिनी बनल्या आहेत.
- आज 70 टक्क्यांपेक्षा अधिक पीएम घरकूले एकट्या अथवा संयुक्त रूपाने महिलांच्या नावावर आहेत.
- स्टॅंड-अप इंडिया योजनेअंतर्गत 75 टक्के कर्ज महिलांना देण्यात आले आहे. याशिवाय जन धन खात्यांमध्ये 55 टक्के भागीदारी महिलांची आहे.

**70%** कर्ज मुद्रा योजनेअंतर्गत महिलांना मिळाले आहे.

- 26 आठवडे प्रसुतीसाठी महिलांना रजा दिली जाते.
- 10 कोटी महिला गेल्या 12 वर्षांमध्ये स्वयं मदत गटाशी जोडल्या गेल्या आहेत.
- 6 कोटी माता-भगिनींना लखपती दीदी बनविण्याचे लक्ष्य सरकारने निश्चित केले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी हे लक्ष्य ठेवले आहे. यामध्ये 3 कोटींपेक्षा जास्त ग्रामीण महिला आतापर्यंत लखपती दीदी बनल्या आहेत.
- सप्टेंबर, 2015 मध्ये सरकारने सुरू केलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या उपक्रमांतर्गत जवळपास सात कोटी महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.




- 2015 मध्ये सरकारने मिशन इंद्रधनुष्य कार्यक्रम सुरू केला. त्यानुसार ज्या बालकांचे आणि गर्भवती महिलांचे लसीकरण होऊ शकले नाही, त्यांच्यापर्यंत लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून पोहोचून त्यांचे लसीकरण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.
- मिशन शक्ति पोर्टल: जानेवारी 2025 मध्ये मिशन शक्ती पोर्टल (**https://missionshakti.wcd.gov.in/**) सुरू करण्यात आले. 23 मार्च, 2026 पर्यंत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्यावतीने 2,428 संरक्षण अधिका-यांचे विवरण पोर्टलवर अद्यतन करण्यात आले आहे.



## सशक्त होत आहेत महिला

**48%** टक्क्यांपेक्षा जास्त स्टार्टअपमध्ये कमीत कमी एक महिला संचालक.

- भारताच्या महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्व करंडक जिंकला. याचप्रकारे दृष्टीबाधित दिव्यांग महिला क्रिकेट संघानेही विश्व चषक जिंकला आहे.
- राष्ट्रीय संरक्षण अकादमी म्हणजेच एनडीए मध्ये महिला कॅडेट्सच्या पहिल्या तुकडीने आपला अभ्यासक्रम पूर्ण केला.




पीएच.डी. मध्ये महिला संशोधनकर्त्यांचे नावनोंदणीचे प्रमाण 135.6 टक्के इतके विक्रमी वाढले आहे( 2014-15 ते 2022-23 पर्यंत). हे प्रमाण दुपटीपेक्षाही जास्त वाढले आहे. यामुळे 64,724 अतिरिक्त महिला संशोधन कार्याशी जोडल्या गेल्या आहेत.



जवळपास **43%** टक्क्यांपर्यंत गणित आणि विज्ञान विषय म्हणजेच STEM Education घेणा-या मुलींची संख्या गेली आहे.

# महिला सशक्तीकरण

नवभारताची 12 वर्षे

## महिलांसाठी अनेक योजना

### आनंदाची ज्योती : उज्ज्वला योजना

**10.57** कोटींहून अधिक गॅस जोडण्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत 1 मार्च 2026 पर्यन्त वितरित करण्यात आल्या.

गॅस आल्यामुळे दररोजचे 2 ते 3 तास महिलांचे वाचतात. यापूर्वी चूलीवर स्वयंपाक करण्यासाठी महिलांना लाकूडफाटा आणि इतर साधनसामुग्री जमा करण्यासाठी जो खूप वेळ लागत होता, तो आता गॅसमुळे वाचतो. महिलांना आता या वेळेचा सदुपयोग करून आपले उत्पन्न वाढविण्यासाठी काहीतरी वेगळे काम करता येते किंवा कुटुंबाची देखभाल करण्यासाठी त्यांना वेळ मिळतो.



### बेटी बचाओ बेटी पढाओ (बीबीबीपी) योजना

22 जानेवारी, 2015 रोजी हरियाणातील पानिपत येथे सुरू करण्यात आलेल्या बेटी बचाओ बेटी पढाओ (बीबीबीपी) योजनेची आता दशकपूर्ती झाली आहे.

**जन्माच्या वेळी राष्ट्रीय स्तरावर लिंग गुणोत्तर**
(प्रति 1000 मुली)



| 2014-15 | 2024-25 |
|---|---|
| 918 | 929 |

**माध्यमिक स्तरावर शाळेमध्ये दाखला असलेल्या मुलींचे गुणोत्तर**

| | |
|---|---|
| 2014-15 | 75.51% |
| 2024-25 | 80.2% |



### प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

**8,812** नोंदणीकृत स्वेच्छाकर्मी

**22,349** पीएमएसएमए सेवा प्रदान केल्या जाणा-या सुविधांची संख्या

### प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

या योजनेतून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गर्भवती आणि बाळांना स्तनपान देणा-या मातांना पहिल्या अपत्याच्या जन्माच्या वेळी 5,000 रूपये (त्याचबरोबर जननी सुरक्षा योजना प्रोत्साहन म्हणून सरासरी 6,000रूपये ) आणि दुस-या अपत्याच्यावेळी (जर मुलगी झाली तर) 6,000 रूपये मातृत्व लाभ प्रदान केला जातो.



**4.28** कोटी महिलांना मिळाला लाभ

**4.92** कोटी महिलांनी केली नावनोंदणी

**20,150** कोटी रूपये एकूण निधीचे केले वितरण

### सुकन्या समृद्धी योजना
**बालिकांचे सशक्तीकरण**

- 22 जानेवारी, 2015 रोजी सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेअंतर्गत सुकन्या समृद्धी योजना सुरू केली. त्यासाठी 8.2 टक्के व्याजदर ठेवण्यात आला आहे.
- 4.6 कोटींपेक्षा जास्त खाती उघडण्यात आली आहेत. योजनेच्या प्रारंभापासून ते आत्तापर्यंत 3.33लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी जमा झाला आहे.

> *आज विकसित भारताच्या आपल्या प्रवासामध्ये महिलांची भूमिका अधिक महत्वपूर्ण झाली आहे. मला आनंद वाटतो की, 2014 मध्ये, तुम्ही सर्व देशवासियांनी आम्हाला सेवा करण्याची संधी दिली आणि त्यावेळेपासून आत्तापर्यंत, आमच्या सरकारने महिलांच्या जीवनचक्रातील प्रत्येक टप्प्यासाठी योजना बनविल्या. त्या योजना यशस्वीतेने लागू केल्या.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

नवभारताची 12 वर्षे

# मध्यमवर्ग

## 12 लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त

*झपाट्याने बदलणाऱ्या भारतात विकास असो वा प्रशासन, धैर्य असो किंवा दृढ निश्चय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मध्यमवर्ग ही एक प्रमुख शक्ती आहे. लोकसंख्येच्या एक तृतीयांश असलेला मध्यमवर्ग समृद्ध आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण शक्ती आहे, ज्यांच्या महत्वाकांक्षांना केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षात नवीन उभारी दिली आहे*

### प्राप्तिकरातून सवलत

**₹12 लाख** पर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर नवीन कर प्रणालीनुसार कोणताही प्राप्तिकर नाही.



**₹75,000** रुपयांच्या मानद वेतनप्राप्त करदात्यांसाठी 12.75 लाख रुपयांची मर्यादा.

- केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 मध्ये सर्व करदात्यांना लाभ देण्यासाठी प्राप्ती कर टप्पे आणि दरांमध्ये व्यापक बदल करण्यात आले आहेत.
- स्लॅब दरांमध्ये कपात आणि सवलतींच्या माध्यमातून मध्यम वर्गाला व्यापक सवलती, देशांतर्गत वापर खर्च आणि गुंतवणूकीला चालना मिळेल.
- प्राप्तिकर भरणाऱ्यांची संख्या आर्थिक वर्ष 2022 मधील 6.9 कोटींवरून आर्थिक वर्ष 2025 मध्ये 9.2 कोटी वर पोहोचली.

### उडान योजना



**1.64** कोटीहून अधिक देशवासीयांनी 3.45 लाख विमानसेवांच्या माध्यमातून उड्डाण योजनेचा लाभ घेतला आहे.

केंद्र सरकारने या योजनेचा आणखी विस्तार केला आहे. यासाठी सुमारे 29 हजार कोटी रुपयांना मंजुरी देण्यात आली आहे.

**665** मार्गांनी 95 विमानतळे, हेलीपॅड आणि जल विमानतळांना जोडले गेले आहे.

- या अंतर्गत येत्या काही वर्षात छोट्या-छोट्या शहरांमध्ये 100 नवीन विमानतळे आणि 200 नवीन हेलीपॅड बांधण्याची योजना आहे.
- वर्ष 2014 पूर्वी देशात केवळ 74 विमानतळे होती. आज देशात 160 हून अधिक विमानतळे आहेत.

### वंदे भारत सेवा

**9.1** कोटी यात्रेकरूंनी वंदे भारत सेवा सुरू झाल्यापासून 31 मार्च 2026 पर्यंत प्रवास केला आहे. 1 लाख फेऱ्यांमध्ये हा प्रवास झाला आहे.


**162** वंदे भारत सेवा आतापर्यंत सुरू करण्यात आल्या आहेत ज्यामुळे कॉरिडोर प्रवासा साठीचा वेळ 45% पर्यंत कमी झाला आहे.

**90** सेवा 8-कोच सहित | **38** सेवा 20-कोच सहित | **34** सेवा 16-कोच सहित

गरीब तसेच मध्यमवर्गीयांना अविरत सेवा पुरविणारी भारतीय रेल्वे, शंभर टक्के विद्युतीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.



### उमंग ॲप : एक मंच, अनेक सेवा




**11.02** कोटी नोंदणी उमंग ॲप वर

**766.35** कोटी व्यवहार

**2,517** सेवा ऑनबोर्ड

2017 मध्ये सुरुवात करण्यात आलेल्या या ॲपचा अर्थ आहे मध्यमवर्गीयांसाठी कमी रांगा,अधिक नियंत्रण आणि सार्वजनिक सेवांमध्ये दृत प्रवेश.

### डिजीलॉकर

DigiLocker

**63.88** कोटींहून अधिक नोंदणीकृत वापरकर्ते

**950** कोटी+ दस्ताऐवज जारी

नवभारताची 12 वर्षे

# मध्यमवर्ग



## मोबाइल डेटाचा खर्च झाला कमी

**97%** मोबाइल डेटावर होणारा खर्च 2014च्या तुलनेत 2025-26 मध्ये कमी झाला.

## स्थावर मालमत्ता नियमन

- घर खरेदी करणा-यांच्या हिताचे रक्षण करणे आणि घरकूल निर्मिती क्षेत्रामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी, संसदेने 2016 मध्ये 'स्थावर मालमत्ता नियमन आणि विकास अधिनियम विधेयक मंजूर केले.
- 1.57 लाख प्रकरणांचा 'रेरा'ने निपटारा केला आहे. 35 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'रेरा' कडे अधिकार आहेत.
- 1.61 लाखांपेक्षा जास्त स्थावर मालमत्ता प्रकल्प आणि 1.13 लाख स्थावर मालमत्ता एजेंट देशभरामध्ये 'रेरा' अंतर्गत नोंदणीकृत आहेत.



## पीएम घरकूल योजना - शहरी

गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय 25 जून, 2015 पासून प्रधानमंत्री घरकूल योजना- शहरी (पीएमएवाय-यू) अंतर्गत केंद्राकडून मदत प्रदान करून राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांना सहकार्य केले जात आहे. त्यामुळे देशभरातील पात्र नोकरदार, व्यावसायिक शहरी लाभार्थींना पायाभूत नागरी सुविधांनी युक्त पक्के घरकूल उपलब्ध करून दिली जात आहेत.



एकूण **125.15** लाख घरांना देशभरांमध्ये आतापर्यंत मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये पीएमवायई-यू 2.0 अंतर्गत 13.67 लाख घरकुलांचा समावेश आहे.

116.57 लाख घरकुलांच्या निर्मितीचे कार्य सुरू करण्यात आले आहे. या घरांना आधीच मंजूरी देण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे, यापैकी 97.30 लाख घरकुलांचा ताबा 2 मार्च 2026 पर्यंत लाभार्थींना देण्यात आला आहे.

## टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्र

**23** मंडळांमध्ये 452 टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्र सुरू



## पीएम सूर्य घर मोफत वीज योजना

**36.88** लाख घरांमध्ये प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत 30 एप्रिल, 2026 पर्यंत सौरप्रणाली लावण्यात आली आहे.



**19,480** कोटी रूपये अनुदान देण्यात आले.

सौर वीज योजनेअंतर्गत स्थापित क्षमता 10.77 गीगावॅटपर्यंत पोहोचली आहे.

## वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

गेल्या 12 वर्षांमध्ये देशाचा आर्थिक पाया चांगलाच भक्कम झाला आहे. जगामध्ये अनेक प्रकारची संकटे येवूनही भारत जागतिक स्तरावर वेगाने पुढे जात असून, एक प्रमुख अर्थव्यवस्था बनला आहे. भारताने महागाई दर कमी ठेवण्यात खूप चांगले यश मिळवले आहे. याचा थेट आणि चांगला परिणाम देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना होत आहे.

“

*मध्यमवर्गीय परिवार देशासाठी खूप काही देत असतात. त्यांचे राहणीमान गुणवत्तापूर्ण असावे, अशी या वर्गाची जी अपेक्षा आहे; त्यामुळे देशाचेही कर्तव्य आहे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही निरंतर प्रयत्न करीत आहोत. मी स्वप्न पाहिले आहे की, 2047 पर्यंत विकसित भारताची स्वप्नपूर्ती होईल. त्याचाच एक भाग म्हणजे सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सरकारचा हस्तक्षेप कमी होईल.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


नवभारताची 12 वर्षे

# पायाभूत सुविधा क्षेत्रात क्रांती

## पायाभूत सुविधांसाठीचा खर्च सहापटीने वाढला

*नव्या भारताची उभारणी, धडाडीच्या सुधारणा आणि अभूतपूर्व पायाभूत सुविधांमुळेच शक्य आहे. देशाच्या विकासात पायाभूत सुविधांना मुख्य प्राधान्य देण्यात आले असून,जलमार्ग, रस्ते आणि रेल्वे, विमानतळ आणि हवाई सेवा अशा प्रत्येक क्षेत्रात मोठ्या वेगाने आणि व्यापक प्रमाणावर काम सुरू आहे.भारताच्या प्रगतीचे आणि समृद्धीचे चिन्ह ठरलेले शेकडो पूल, संसदेची नवीन इमारत, भारत मंडपम, यशोभूमी यांसारख्या वास्तू आत्मनिर्भर भारताच्या मूलभूत विचारसरणीचे प्रतीक बनल्या आहेत. आता आपल्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत, पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करत भारताला विकसित आणि प्रगत राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहे..*

### पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्चात 12 वर्षांत 6 पटीने वाढ




### आधुनिक भारताला बळ देणारे 2,000 पायाभूत सुविधा प्रकल्प

**41.5**

लाख कोटी रुपयांच्या , 1900 पेक्षा जास्त पायाभूत सुविधा प्रकल्पांवर देशात काम सुरू आहे, मार्च 2026 मधील आकडेवारीनुसार. यातील प्रत्येक प्रकल्पाची किंमत 150 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

- भारत सरकार 'पैमाना' या डिजिटल मंचाद्वारे केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे नियमित निरीक्षण आणि नियंत्रण करत आहे. यामुळे, प्रकल्पांची प्रगती वेळोवेळी तपासता येते, अडचणी लवकर लक्षात येतात, आणि उपलब्ध आकडेवारीच्या आधारे अधिक अचूक आणि प्रभावी निर्णय घेणे शक्य होते.
- देशभरात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर मार्च 2026 पर्यंत सुमारे 20 लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.ही रक्कम त्या प्रकल्पांच्या सुधारित अंदाजित एकूण खर्चाच्या सुमारे 48.02% इतकी आहे. म्हणजेच, प्रकल्पांसाठी ठरवलेल्या एकूण खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च आतापर्यंत झाला असून कामे प्रगतीपथावर आहेत.

**1,428**

प्रकल्प वाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राशी (सर्वाधिक) संबंधित आहेत आणि त्यांच्यावर 22.66 लाख कोटी रुपये खर्च केले जात आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, देश दळणवळण-संपर्क आधारित पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देत आहे.

**777**

प्रकल्पांची प्रगती 80% पेक्षा जास्त झाली आहे.

**1,941**

निर्माणाधीन पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी 786 हे 'मेगा प्रोजेक्ट्स' आहेत, ज्यांची किंमत 1,000 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे.

### आता प्रकल्प रखडत किंवा रेंगाळत नाहीत

- 'प्रगती' म्हणजेच 'प्रो-ॲक्टिव्ह गव्हर्नन्स अँड टाइमली इम्प्लीमेंटेशन' म्हणजेच सक्रिय प्रशासन आणि योजनांची/निर्णयांची वेळेत अंमलबजावणी, याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये केली होती. यामध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रकल्पांचे संनियंत्रण स्वतः त्यांच्या नेतृत्वाखाली केले जात आहे.
- यामुळे प्रकल्पांना होणारा उशीर कमी झाला असून खर्च वाढण्यासही पायबंद बसला आहे.

**85**

लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्य असलेल्या 382 हून अधिक प्रकल्पांचा आढावा 'प्रगती'च्या माध्यमातून घेण्यात आला आणि पंतप्रधान मोदींच्या निर्देशानुसार त्यातील अडचणी वेळेत दूर करण्यात आल्या.



# आत्मनिर्भर भारत

नवभारताची 12 वर्षे

## आत्मनिर्भरतेमुळे वाढली निर्यात

२०२५-२०२६ मध्ये भारताची वस्तू आणि सेवा क्षेत्रातील एकूण निर्यात, विक्रमी ८६०.०९ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहचली. ही निर्यात २०१४ मध्ये ४७९ अब्ज डॉलर्स होती.




आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात **48** अब्ज डॉलर्स झाली, जी 2014-15 मध्ये केवळ 6.3 अब्ज डॉलर्स होती. हा सरासरी 20.3% वार्षिक वृद्धी दर आहे.


- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताची कृषी, फलोत्पादन आणि सागरी उत्पादनांची निर्यात 52.6 अब्ज डॉलर्स झाली, जी 2013-14 मध्ये 39.6 अब्ज डॉलर्स होती.

### मोबाईल फोन निर्यातीत 166 पट वाढ






### संरक्षण निर्यातीत 20 पट वाढ






## आर्थिक ताकद वाढवणारे सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग (एमएसएमई)



**7.47** कोटींहून अधिक एमएसएमई, उत्पादन, सेवा आणि व्यापारी उपक्रमांशी जोडले गेले आहेत.

**31.1%** योगदान भारताच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचे आहे.

**48.58%** वाटा या क्षेत्राचा देशाच्या एकूण निर्यातीत आहे.

**35.4%** वाटा एमएसएमईचा उत्पादन क्षेत्राच्या एकूण उत्पादनात आहे.

**32.8** कोटी लोकसंख्येला एमएसएमई क्षेत्र उदरनिर्वाह पुरवते.

## आकडेवारी... जी आहे मजबुतीची ओळख

आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताचा जीडीपी, विद्यमान किमतींनुसार **357.14** लाख कोटी रुपये राहण्याचा अंदाज आहे.

मुंबई शेअर बाजाराचे मार्केट कॅपिटलायझेशन **484** लाख कोटी रुपये इतके झाले आहे, याचा अर्थ भारतीय शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. (आकडेवारी 14 मे, 2026 पर्यंतची आहे.)


- उत्पादना नुसार प्रोत्साहन योजनेअंतर्गत मार्च 2026 पर्यंत 20.41 लाख कोटी रुपयांच्या विक्रीची नोंद झाली आहे.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 135.4 अब्ज डॉलर्सचे रेमिटन्स प्राप्त करून भारत जगातील सर्वात मोठा रेमिटन्स मिळवणारा देश बनला आहे.
- **शेड्युल्ड कमर्शियल** बँकांचे थकीत कर्जाचे प्रमाण (एन पी ए) मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. मार्च 2015 मध्ये एनपीएचे प्रमाण 4.28% (3.23 लाख कोटी रुपये) होते. डिसेंबर 2025 मध्ये ते कमी होऊन 1.89% (4.03 लाख कोटी रुपये) झाले. सद्यस्थितीतील एनपीए हा गेल्या अनेक दशकांतील सर्वात नीचांकी पातळीवर आहे.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 22 लाख कोटी रुपये किंवा त्याहून अधिक विक्रमी जीएसटी संकलन झाले, जे भारताच्या मजबूत कर व्यवस्थेचे प्रमाण आहे.
- दिवाळखोरी आणि नादारी संहितेच्या (आयबीसी ) माध्यमातून सप्टेंबर 2025 पर्यंत कर्जदात्यांना 3.99 लाख कोटी रुपयांची रक्कम परत मिळवून देण्यात आली आहे.

# तृणमूलमधील बंड आणि भाजपाचे वेगळेपण



पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पार्टीच्या दणदणीत विजयामुळे राष्ट्रीय राजकारणाला बसलेल्या हादऱ्याचे धक्के अजूनही जाणवताहेत. सलग १५ वर्षे पश्चिम बंगालची सत्ता निरंकुश पद्धतीने भोगलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे ४ मे रोजी निकाल लागले आणि अवघ्या महिन्याभरात तृणमूल काँग्रेसमध्ये घडलेल्या घडामोडी पाहिल्यावर हा पक्ष किती भुसभुशीत पायावर उभा होता हे दिसून आले आहे.

**तृणमूल** काँग्रेसचे ८० आमदार या वेळच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. त्यातील ६० आमदारांनी एकत्र येऊन आमचाच पक्ष करा तृणमूल असल्याचा दावा करीत ममता बॅनर्जींनी निवडलेल्या गटनेत्याची नियुक्ती अमान्य केली. याचा सरळसरळ अर्थ असा आहे की निवडून आलेल्या आमदारांनी आता ममता बाईंचे नेतृत्व झुगारून दिले आहे. तर काकोली घोष यांच्या नेतृत्वाखाली २० खासदारांनी एनसीपीआय या त्रिपुराच्या प्रादेशिक पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला. ममता बाईंच्या नेतृत्वाखाली आणि ममतांचा भाचा अभिषेक बॅनर्जी याच्या छत्रछायेखाली काम केल्यास आपल्याला भवितव्य नाही असे लक्षात आल्यामुळेच या आमदारांनी आणि खासदारांनी पक्षाच्या नेतृत्वाविरोधात बंडाचा झेंडा फडकावला आहे. या घडामोडीमुळे ममता बॅनर्जी यांच्या राजकीय अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला आहे. सलग १५ वर्षे सत्ता भोगलेल्या पक्षाचे दोन तृतीयांश संख्येपेक्षा अधिक आमदार एका झटक्यात पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाचा निर्णय झुगारून देतात त्यावेळी या पक्षाचा संघटनात्मक आधार किती पोकळ होता हेच दिसते. भारतीय जनता पार्टीच्या विजयानंतर पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या राजवटीविरोधात असलेला असंतोष प्रचंड प्रमाणात उफाळून येत आहे. अभिषेक बॅनर्जी यांना झालेली मारहाण राष्ट्रीय पातळीवरील बातम्यांचा विषय ठरली. पण त्याखेरीज तेथे घडलेल्या अनेक घटना तृणमूलच्या दडपशाही राजवटीविरोधात सामान्य माणसाच्या मनात किती संताप खदखदतो आहे,



याचे प्रतीक आहे. तृणमूलच्या पदाधिकाऱ्यांच्या घरात घुसून जनतेकडून त्यांनी वसूल केलेली खंडणी, हप्त्याची रक्कम वसूल केली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये सरकारच्या नावावर गुंडपुंडांचे, जिहाद्यांचेच राज्य चालत होते हेच दर्शविणाऱ्या या घटना आहेत. याविरोधातील उद्रेक हळूहळू राज्यभरात होतो आहे. या उद्रेकाचा फटका आपल्याला बसू नये म्हणूनच तृणमूलच्या अनेक आमदारांनी स्वतःला ममता, अभिषेकपासून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. विधानसभा निवडणुकीत एवढा मोठा फटका बसूनही ममता बाई आपला भाचा अभिषेक ह्याच्याकडेच पक्षाची सूत्रे पुन्हा देताहेत हे अनेक आमदारांना पसंत पडलेले नाही. तृणमूल हा ममता बॅनर्जी यांच्या कुटुंबाचा खासगी मालकीचा पक्ष बनल्याने त्या आपल्या भाच्याशिवाय अन्य कोणाही नेत्याच्या हातात पक्षाची सूत्रे देण्यास तयार नाहीत, हे दिसल्याने या आमदारांना बंडाचा झेंडा फडकावण्याशिवाय पर्याय राहिलेला नव्हता.



या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचा आजवरचा प्रवास आठवतो . १९७९ मध्ये जनता पक्षातील जनसंघाच्या नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवू नयेत, अशी मागणी जनता पक्षातील समाजवादी विचाराच्या मंडळींनी केली. ही मागणी अमान्य करत अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी या नेत्यांनी जनता पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही आमची मातृसंस्था असून सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या विचारधारेवर आम्ही ठाम आहोत. अशी भूमिका घेत अटलजी आणि अडवाणी यांनी भारतीय जनता पार्टीची स्थापना करण्याचा निर्णय जाहीर केला. १९८० ते २०२६ या ४६ वर्षाच्या इतिहासात भारतीय जनता पार्टीने अनेक खाचखळगे अनुभवले, टिंगलटवाळी सहन केली. मात्र अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पक्ष वाढवताना पक्षाच्या विचारधारेशी कधीच तडजोड केली नाही. भारतीय जनता पार्टीची स्थापना होत असताना भारतीय लोकदल, पूर्वाश्रमीच्या समाजवादी विचारधारेच्या मंडळींचा जनता पक्ष, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष हे प्रमुख विरोधी पक्ष म्हणून राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसला आव्हान देत होते. यातील जनता पार्टी आणि लोकदलाने जनता दलाच्या रूपाने १९८०च्या उत्तरार्धात आणि १९९० च्या पूर्वार्धात राष्ट्रीय राजकारणात लक्षणीय स्थान मिळवले होते. जनता दलाने काही काळ आघाडीच्या रूपाने केंद्रातील सत्ताही काही काळ उपभोगली. मात्र हे सर्व पक्ष आता राष्ट्रीय राजकारणात नगण्य ठरले आहेत. समाजावादी विचारधारेचे समाजवादी पार्टी आणि राष्ट्रीय जनता दल हे दोन पक्ष उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये आपले अस्तित्व राखून आहेत. मात्र हे दोन्ही पक्ष एका कुटुंबापुरते मर्यादित झाले आहेत. कम्युनिस्ट पक्षाचे केरळ बाहेर अस्तित्वही दिसत नाही. भारतीय जनता पार्टी मात्र या ४६ वर्षात सातत्याने वाढत जाणारा पक्ष ठरला आहे. याचे कारण भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने प्रखर राष्ट्रवादाची विचारसरणी सत्तेसाठी कधीच सोडली नाही. त्या आधी जनसंघाने १९५१ पासून राष्ट्रीय राजकारणात पाऊल ठेवल्यानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत पक्ष संघटनेची बांधणी केली. सत्ता मिळण्याची दूरदूर शक्यता दिसत नसतानाही जनसंघाने आपली निष्ठावान कार्यकर्त्यांची फौज देशभर निर्माण केली. १९८४ मध्ये अटलबिहारी वाजपेयींसह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते पराभूत झाले तरी पक्षाचा एकही कार्यकर्ता सत्तेच्या वळचणीला गेला नाही. २०२१ मध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे ७७ आमदार निवडून आले होते. यापैकी काही आमदार वगळता अन्य सर्व आमदारांनी पक्षात राहून तृणमूलविरोधात लढा दिला. २०२१ पासून ३०० पेक्षा अधिक भाजपा कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या तरी ममतांच्या दहशतीविरोधातील भाजपाचा आवाज बुलंदच राहिला. त्यामुळेच यावेळच्या निवडणुकीत मतदारांनी भाजपाला तृणमूलचा सशक्त पर्याय म्हणून निवडले. प्रखर राष्ट्रवादाची विचारसरणी हाच भाजपाचा भक्कम वैचारिक पाया आहे. असा पाया अन्य पक्षांकडे नसल्याने राष्ट्रीय राजकारणात असे पक्ष कसेबसे टिकून आहेत. ■



नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा पंचायत समिती सदस्य विजय घांगळे यांच्यासह मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आदिवासी मोर्चा प्रदेश सरचिटणीस एन. डी. गावित, उत्तर जिल्हाध्यक्ष यतिन कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव आदी.



भटके विमुक्त मोर्चाचे संमेलन– उपस्थिती– मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम, मोर्चाचे अध्यक्ष चंद्रकांत शिंदे, नगरसेवक प्रतीक कर्पे, मुंबई सरचिटणीस पवन त्रिपाठी, सरचिटणीस श्वेता परुळेकर, मुंबई कार्यकारिणी सदस्य रश्मी जाधव, गिरीधर साळुंके आदी.



पारनेर–मतदार यादी शुद्धीकरण कार्यशाळा– उपस्थिती– प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, भाजप अहिल्यानगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, विश्वनाथ कोरडे, जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, मंडल अध्यक्ष राहुल शिंदे–पाटील, शिवाजी खिलारी, सचिन वराळ–पाटील, दत्ता पवार, दीपक इंगळे, अतुल माने.









नवी दिल्ली येथील केंद्रीय मुख्यालयात मोदी सरकारच्या कामगिरीचे चित्रप्रदर्शन– उपस्थिती– राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, राष्ट्रीय सरचिटणीस खा. अरुण सिंग, दुष्यंत गौतम, तरूण चुग, प्रदेशाध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा, खा.डॉ. संजय जैसवाल आदी.







मुंबई येथे मोदी सरकारच्या कामगिरीचे चित्रप्रदर्शन– उपस्थिती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण. मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com